
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष पंचविसावे / अंक ९ / सप्टेंबर २०२४

## संपादकीय

## मुलांनी मुलांसाठी भरवलेले विज्ञान प्रदर्शन

विज्ञानात सतत प्रगती होत असते. या प्रगतीची जाणीव शाळकरी मुलांना व्हावी यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जातात. एवढेच नव्हे तर, वैज्ञानिक प्रगतीचा आधार घेऊन समस्या निरसन कसे करता येईल याचे देखील ज्ञान त्यांना देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. शाळकरी मुलांना आपल्या नव-संकल्पना सादर करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर विज्ञान प्रदर्शनं आयोजित करण्यात येतात. अशाच प्रकारचे एक प्रदर्शन हाँगकाँग शहरात मागील पाच दशकांपासून भरविण्यात येत आहे. त्याला 'जॉइंट स्कूल सायन्स एक्झिबिशन', थोडक्यात 'जेएसएससी' (Joint School Science Exhibition, JSSE) असे म्हणतात. या प्रदर्शनाची सुरुवात १९६८ मध्ये झाली. दरवर्षी नित्यनेमाने हे प्रदर्शन हाँगकाँग शहरात भरविण्यात येते. या मालिकेतील ५७ वे प्रदर्शन २० ते २६ ऑगस्ट या कालावधीत हाँगकाँग शहरात भरविण्यात आले होते.

जेएसससीची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यातील पहिले वैशिष्ट्य असे की, या प्रदर्शनाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी शाळकरी मुलांवर टाकलेली असते. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या मुलांमधून आयोजन समिती गठीत करण्यात येते. या समितीने प्रदर्शनाचा विषय ठरविणे, प्रकल्प सादर करण्यासाठी शाळांना आवाहन करणे, आलेल्या प्रकल्पाचे नियोजन करणे, प्रत्येक प्रकल्प सादर करण्यासाठी पुरेशी व्यवस्था करणे, प्रकल्पांचे मूल्यमापन करणे, उद्घाटन आणि समारोप समारंभ आयोजित करणे या सगळ्या जबाबदाऱ्या आयोजन समितीला पेलाव्या लागतात. त्यांचे शिक्षक त्यांना आवश्यक ती मदत करतात. त्यामुळे प्रदर्शन बिनबोभाटपणे पार पडते.

जेएसएससी स्पर्धेसाठी प्रत्येक वर्षी एक विषय देण्यात येतो. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाने त्या विषयाशी संबंधित प्रकल्प आणायचे असतात. या वर्षीच्या स्पर्धेचा विषय होता 'शाश्वत विकास' (Sustainable development). औद्योगिक क्रांतीनंतर ऊर्जा निर्मिती, वाहतूक, विविध वस्तूंची निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणावर इंधन जाळले जात आहे. यातून निर्माण होणाऱ्या वायूमुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले आहे. याचे अनेक

(मुखपृष्ठ क्र. २ वर)


(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

दुष्परिणाम पाहायला मिळत आहेत. ते टाळून विकासाचा मार्ग कसा चोखाळायचा याचा विचार ज्ञानी माणसे करू लागली आहेत. याच विषयावर शाळकरी विद्यार्थ्यांनी आपली कल्पना मांडावी अशी प्रदर्शन आयोजकांची अपेक्षा होती. त्यासाठी त्यांनी हाँगकाँग शहरातील अनेक शाळांशी संपर्क साधला. तसेच काही उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना देखील त्यांचे प्रकल्प मांडण्यासाठी पाचारण करण्यात आले. आयोजकांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक शाळांनी आणि संस्थांनी आपले प्रकल्प प्रदर्शनात आणले होते.

विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केंद्रीय वाचनालयात केले जाते. वाचनालयाच्या सात मजली इमारतीचा तळमजला प्रदर्शनासाठी राखून ठेवलेला आहे. विविध विषयांवरील प्रदर्शने इथे भरविली जातात. काही वर्षांपूर्वी मी या ठिकाणी चिनी साहित्य या विषयावरील प्रदर्शन पाहिले होते. जेएसएससीच्या आयोजनासाठी ही जागा दरवर्षी विनामूल्य उपलब्ध करून दिली जाते. प्रदर्शन बघायला येणाऱ्या लोकांना सोयीचे व्हावे यासाठी जागोजागी फलक लावलेले असतात. एवढेच नव्हे तर, वाचनालयात प्रदर्शन असल्याची जाहिरात वेगवेगळ्या ठिकाणी केली जाते. शहर वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बसवर आम्ही ही जाहिरात पाहिली आहे. वाचनालयाचा तळमजला बराच प्रशस्त आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकल्पाला १०० चौरस फूट जागा देण्यात येते. प्रकल्पाची माहिती देणारे पोस्टर लावण्यासाठी पांढऱ्या रंगाचे फलक उपलब्ध करून देण्यात येतात. प्रत्येक फलकावर पुरेसा उजेड पडेल याची व्यवस्था केलेली असते. वाचनालयाच्या तळमजल्यावर एक सभागृह आहे. तिथे २० ऑगस्ट रोजी सकाळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्याच दिवशी दुपारपासून ते प्रदर्शन खुले करण्यात आले. पहिल्या दिवशी प्रदर्शनाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळपासून लोक मोठ्या संख्येने येऊ लागले. यामध्ये शाळकरी विद्यार्थ्यांचा भरणा अधिक होता. याखेरीज काही पालक आणि शिक्षक आपल्या मुलांना घेऊन प्रदर्शन पाहायला येत होते. प्रदर्शन संपेपर्यंत सतत गर्दी असे. २६ ऑगस्टला दुपारी या प्रदर्शनाचा समारोप करण्यात आला. या प्रसंगी पहिल्या तीन प्रकल्पांना बक्षीस देण्यात आले. बाकी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात आले.

जेएसएससी ही प्रामुख्याने हाँगकाँग शहरातील संस्थांसाठी सुरू केलेली स्पर्धा आहे. यात आंतरराष्ट्रीय सहभाग असावा असे आयोजकांना वाटू लागले. म्हणून त्यांनी दुसऱ्या देशांतील त्यांच्या माहितीच्या व्यक्तींशी संपर्क साधून त्यांना प्रकल्प पाठविण्याची विनंती करू लागले. असेच एक विनंतीवजा पत्र २०१२ च्या उन्हाळ्यात मला प्राप्त झाले. त्यावर्षी ठाण्याच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील दोन मुलांचा एक प्रकल्प घेऊन मी हाँगकाँगला गेलो होतो. दोन विद्यार्थी आणि एक शिक्षक अशा तीन व्यक्तींचा तिथला राहण्याखाण्याचा खर्च आयोजन समिती करते. दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१३ ला देखील ठाण्याच्याच विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी नेण्यात आले. दोन्ही वेळेस ठाण्याच्या मुलांनी आपले प्रकल्प चांगल्या पद्धतीने सादर करून शाबासकी मिळवली. २०१४ पासून विशाखापट्टणम येथील 'श्री प्रकाश विद्यानिकेतन' या संस्थेचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ लागले. दरवर्षी दोन विद्यार्थी आणि एक शिक्षक या संस्थेतून प्रकल्प घेऊन जात असतात. यावर्षी त्यांनी दिलेल्या विषयाला अनुसरून असा प्रकल्प बनविला होता.

(पृष्ठ क्र. १८ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा


वर्ष पंचविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२४



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ३ ला)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | श्रुती ते रहमत व परत - प्रवास एका प्रत्यावर्तनाचा | शेफाली वैद्य | २ |
| ३) | जंबुपार आलेखक आणि मी | नरेंद्र गोळे | ५ |
| ४) | 'द कंदाहार हायजॅक' - वेबसिरीज | राजेश कुलकर्णी | ९ |
| ५) | उंटांची अदभूत रम्य दुनिया - २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १४ |
| ६) | परिसर वार्ता | | १९ |




या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रुती ते रहमत व परत - प्रवास एका प्रत्यावर्तनाचा

*ओ. श्रुती नावाची केरळमधील कासरगोड येथील एक हिंदू मुलगी काही वर्षांपूर्वी इस्लामी प्रोपागंडाला बळी पडून मुसलमान झाली व श्रुतीची रहमत बनली. परंतु, काही काळानंतर 'आर्ष विद्या समाजम' ह्या हिंदू संघटनेचे आचार्य श्री मनोज ह्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने पुन्हा स्वखुशीने स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला. श्रुती ते रहमत ते परत श्रुती हा तिचा प्रवास कसा घडला ह्याबद्दल तिने एक छोटे पुस्तक लिहिलेले आहे. 'ओरू परावर्तनतींटे कथा' ह्या शीर्षकाचे हे आत्मचरित्रपर पुस्तक श्रुतीने तिची मातृभाषा मल्याळममध्ये लिहून २०१८ मध्ये केरळमध्ये प्रथम प्रकाशित केले होते. या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन दि १७ जुलै रोजी पुण्यात झाले. या पुस्तकाबद्दल ज्येष्ठ लेखिका शेफाली वैद्य यांचा लेख - संपादक*

दिनांक १७ जुलै रोजी पुण्यात एका आगळ्यावेगळ्या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन झाले. ओ. श्रुती नावाची केरळमधील कासरगोड येथील हव्यक ब्राह्मण कुटुंबातली एक हिंदू मुलगी काही वर्षांपूर्वी इस्लामी प्रोपागंडाला बळी पडून मुसलमान झाली व श्रुतीची रहमत बनली. परंतु, काही काळानंतर 'आर्ष विद्या समाजम' ह्या हिंदू संघटनेचे आचार्य श्री मनोज ह्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने पुन्हा स्व-खुशीने स्व-गृही परतण्याचा निर्णय घेतला. 'श्रुती ते रहमत ते परत श्रुती' हा तिचा प्रवास कसा घडला ह्याबद्दल तिने एक छोटे पुस्तक लिहिलेले आहे. 'ओरू परावर्तनतींटे कथा' ह्या शीर्षकाचे हे आत्मचरित्रपर पुस्तक श्रुतीने तिची मातृभाषा मल्याळम मध्ये लिहून २०१८ मध्ये केरळमध्ये प्रथम प्रकाशित केले होते. केरळमध्ये हे पुस्तक प्रचंड लोकप्रियही झाले होते. परंतु दुर्दैवाने मल्याळम मध्ये




असल्यामुळे केरळच्या बाहेर फारसे कोणाला या पुस्तकाबद्दल फारशी माहिती नव्हती. पण नंतर 'स्टोरी ऑफ अ रिव्हर्शन' या नावाने ह्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि पद्मश्री गिरीश प्रभुणे ह्यांच्या हस्ते 'कथा एका प्रत्यावर्तनाची' ह्या नावाने हे पुस्तक मराठी भाषेतही प्रसिद्ध झाले.

साध्या-सोप्या भाषेत लिहिल्या गेलेल्या ह्या पुस्तकातून इस्लामी मतप्रसाराबद्दलच्या अनेक गोष्टी उघड होतात. अनेक मिथकांना छेद देणारे असे हे पुस्तक आहे. 'जातिभेदाला आणि गरिबिला कंटाळून हिंदू लोक मुसलमान होतात' असा एक तथाकथित पुरोगाम्यांचा लाडका सिद्धांत आहे. पण ते खरे नाही. इस्लाम ही एक प्रीडेटरी विचारसरणी आहे, जी सतत भक्ष्याच्या शोधात असते. गरीब, श्रीमंत, स्त्री, पुरुष, खालची-वरची जात ह्यातला कोणीही हिंदू

कधीही इस्लामी विचारसरणीची शिकार होऊ शकतो. कारण सर्वसामान्य हिंदू व्यक्तीला आपल्या धर्माची, त्यातल्या तत्त्वांची इतकी कमी माहिती असते की, तो किंवा ती स्वतःला डिफेंड करू शकत नाही आणि अब्राहमीक विचारसरणीबद्दलचे आपले अज्ञान इतके अगाध असते की, आपण त्यांच्या विचारसरणीवर मुद्देसूदपणे हल्ला करू शकत नाही.

आपल्या घरांमधून, शाळांमधून, धार्मिक संस्थांमधून सुद्धा आपण आपल्या मुलांना हिंदू धर्माबद्दल शास्त्रशुद्ध ज्ञान देतच नाही. त्यामुळे तरुणांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. मिशनरी आणि इस्लामिस्ट बरोबर ह्याच वैचारिक गोंधळाचा फायदा घेतला आणि त्यांच्या मते 'काफिर' असलेल्या व्यक्तींना इस्लाम स्वीकारायला प्रवृत्त करतात. श्रुतीचे नेमके तेच झाले. एकीकडे तिच्या कुटुंबात तिला 'सर्व धर्म सारखे' ही शिकवण दिली गेली; पण त्याचबरोबर स्वतःच्या धर्माबद्दल नीटसे काहीच सांगितले गेले नाही. दुसरीकडे ती शिक्षणासाठी घरापासून दूर राहताना बरोबरीच्या मुसलमान मैत्रिणी आणि त्यांचे कुटुंबीय ह्यांनी ठरवून विचारपूर्वक इस्लामबद्दल सतत इतकी सकारात्मक माहिती दिली की, स्वतःच्या हिंदू असण्याबद्दल आधीच संभ्रमित असलेली श्रुती तिच्याही नकळत इस्लामच्या प्रभावाखाली आली. विशेष म्हणजे कोणा मुसलमान मुलाच्या प्रेमात पडून श्रुती इस्लामकडे आकर्षित झाली नाही. तर स्व-धर्माबद्दलचे अज्ञान आणि इस्लामबद्दलचे सतत देण्यात येणारे, वरवर तार्किक वाटणारे ज्ञान ह्या दोन गोष्टींचा एकत्रित प्रभाव तिच्यावर पडून ती मुसलमान झाली. हा सर्व प्रवास तिने प्रांजळपणे ह्या पुस्तकात मांडला आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे, इस्लामचा योजनाबद्ध रीतीने प्रसार-प्रचार करण्यासाठी विविध भारतीय भाषांमधून मोठ्या प्रमाणात लिखित, ऑडिओ-व्हिज्युअल क्लिप्स, पुस्तके वगैरे साहित्य सहज उपलब्ध जे इस्लामची फक्त चांगली बाजूच मांडते. एकदा एखाद्या हिंदू व्यक्तीने इस्लाम स्वीकारला की मगच इस्लामचे कठोर वास्तव त्यांच्या समोर येते. पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. अनेकदा असे अनेक हिंदू जे चुकीच्या समजुतीमुळे किंवा समजुतीच्या अभावामुळे इस्लाम धर्म स्वीकारतात, ते पुन्हा त्यांच्या हिंदू धर्मात परतू इच्छितात. परंतु त्यांना योग्य वेळेला योग्य ते सहाय्य करणारी सुनियोजित सपोर्ट सिस्टम हिंदूंमध्ये अजून म्हणावी तशी मोठ्या प्रमाणावर सर्वत्र उपलब्ध नाही. श्रुतीच्या सुदैवाने तिला योग्य वेळी 'आर्ष विद्या समाजम' ही संस्था सापडली आणि तिचे प्रत्यावर्तन यशस्वी झाले.

आपल्या भाषणात श्रुती काल म्हणाली, 'हिंदू म्हणून जन्मले असूनही मला माझ्या धर्माच्या विश्वास, विधी किंवा दैवी संकल्पनांमध्ये कोणतीही निष्ठा नव्हती. मला मिळालेले इतिहासाचे ज्ञान शाळेत शिकलेल्या गोष्टींपुरतेच मर्यादित होते. माझ्या इस्लामिक मित्रांनी मला त्यांचा इतिहास शिकवला. त्यांनी मला इस्लामिक तत्त्वज्ञान तर शिकवलेच, पण माझ्या धर्मावर टीका करताना त्यांना मी जेव्हा ऐकले, तेव्हा टीका करताना देखील त्यांना माझ्या धर्माबद्दल माझ्यापेक्षा किती अधिक माहिती होते हे पाहून मी थक्क झाले.'

सततच्या ब्रेनवॉशिंगमुळे श्रुती मंदिरे, मूर्तिपूजा आणि हिंदू रीतरिवाज ह्यांच्यापासून हळूहळू दूर जाऊ लागली, ज्यामध्ये तिच्या मुस्लीम मित्र-मैत्रिणींनी दिलेले मूर्तीपूजेविरुद्धचे प्रचार साहित्य महत्त्वाचे ठरले. त्याचबरोबर इस्लाम हा कसा सर्व बाबतीत श्रेष्ठ आहे हेही तिच्या मनावर बिंबवले जात होतेच. ह्या द्विधा मन:स्थितीत असताना श्रुती तिच्या घरी कासरगोडला गेली की, तिचे आपल्या आई-वडिलांशी खटके उडत. त्यांना पूजा करताना बघितले की, श्रुतीला त्यांची चीड येई. ती एकांतात नमाज पढत असे. मानसिक दृष्ट्या तिचे मतांतर पूर्ण झाले होते तरी तिला ब्रेनवॉश करणारे

लोक खुश नव्हते. त्यांनी श्रुतीला औपचारिकरीत्या मुसलमान व्हायचा सल्ला दिला.

ऑक्टोबर २०१३ मध्ये श्रुती तिचे घर सोडून मल्लपुरम येथे गेली आणि मौनथुल इस्लाम सभा येथे औपचारिकपणे इस्लाम स्वीकारला. 'तो विधीही अगदीच सोपा आणि सुटसुटीत होता' असे ती म्हणते. 'एका बाईने माझ्या डोक्यावर तीन वेळा पाणी ओतले आणि मला काही अरबी श्लोक तिच्या पाठोपाठ म्हणायला लावले आणि मी मुसलमान झाले. मी 'रहमत' हे नाव स्वीकारले. मी माझ्या पालकांनी दिलेले 'श्रुती' हे नाव, ज्याचा अर्थ 'वेद' आहे ते नाकारले'. पुढे ती म्हणते की, 'त्या संस्थेत धर्मांतरासाठी आलेल्या ६५ महिला होत्या. त्यात वृद्ध महिला, पूर्ण गर्भवती महिला, १६-१७ वर्षांच्या मुली, आणि दोन मुली असलेली महिला अशा सर्व महिलांचा समावेश होता आणि सर्व हिंदू होत्या.' त्यांच्यापैकी फार कमी स्त्रिया श्रुतीसारख्या इस्लाम पटला म्हणून आल्या होत्या. बाकीच्यांना काही आर्थिक प्रलोभन तरी दिले गेले होते किंवा त्यांच्या मुस्लीम पतींनी किंवा प्रियकरांनी त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी भाग पाडले होते.

तिच्या आई-वडिलांना जेव्हा हे समजले तेव्हा त्यांनी पोलिसात तक्रार केली. श्रुतीला न्यायालयाच्या आदेशानुसार कासारगोडमध्ये परत आणले गेले तेव्हा तिला मौनथुल इस्लामवाल्या लोकांनी तिच्या नव्या विचारांवर ठाम राहायचा सल्ला दिला. 'आई-वडील आजारी पडले तरी, त्यांनी जीव द्यायची धमकी दिली तरी त्यांचे ऐकू नको' असे तिला सांगितले गेले. श्रुतीच्या सुदैवाने काही हिंदू संघटनांच्या मदतीने तिला 'आर्य विद्या समाजम' ह्या संस्थेत पाठवले गेले, जिथे आचार्य मनोज ह्या तिथल्या गुरूंनी तिच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देऊन, तिच्याशी तार्किकपणे वाद घालून, तिला हिंदू धर्माची थोरवी पटवून दिली. इस्लामचा स्त्रीसंबंधी दृष्टिकोन काय आहे हेही तिला पुरावे देऊन पटवले गेले. हे सर्व डिबेट आणि पुरावे तिने ह्या पुस्तकात दिलेले आहेत.

रहमत बनलेली श्रुती परत एकवार श्रुती बनून स्व-गृही तर परतलीच, त्याबरोबरच ती एव्हीएसची पहिली पूर्णवेळ महिला कार्यकर्ती बनली. आज तिच्यासारख्याच ब्रेनवॉशिंगला बळी पडून इस्लाम आणि ख्रिश्चन बनलेल्या हजारो हिंदू मुलींना त्यांच्या मूळ धर्मात परत आणण्याच्या कामाला तिने स्वतःला वाहून घेतलेले आहे. श्रुतीचे हे पुस्तक म्हणजे केवळ घटनांचे वर्णन नाही, तर हिंदू धर्मातील अध्यात्म आणि इस्लामी कट्टरतावादाबद्दलच्या मुद्यांचा सखोल अभ्यास आहे. एका बैठकीत सहज वाचून होणारे हे पुस्तक वाचकांना अनेक धक्के देते. स्व-धर्माविषयी जागरूक सर्व हिंदूंनी नुसते वाचावेच नाही, तर पाच प्रती विकत घेऊन इतरांना भेट म्हणून द्यावे इतके मोलाचे हे पुस्तक आहे. पुस्तक विकत घेण्याची लिंक पहिल्या कॉमेंटमध्ये देत आहे.

**- शेफाली वैद्य**
ज्येष्ठ लेखिका
पुणे

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**


# जंबुपार आलेखक आणि मी

*ज्येष्ठ संशोधक व वैज्ञानिक श्री नरेंद्र गोळे यांचा 'पर्यावरण स्नेही अणुऊर्जा' या विषयावरील अत्यंत उद्बोधक लेख - संपादक*

भौतिकशास्त्रात प्रक्रियांतील चलांची (पॅरामीटर्स ची) नोंद करण्याच्या असंख्य पद्धती आजवर उपयोगात आणल्या गेलेल्या आहेत. चल, आपली मूल्ये काळासोबत बदलत असतात. नेमक्या कोणत्या वेळी त्यांची मूल्ये कोणती होती, हे समजल्यास अनेक प्रयोग परिणतीस पोहोचू शकतात. मात्र ती नोंद करताना, काही प्रसंगांत चले एवढ्या झपाट्याने बदलत असतात की, काही लघुसेकंदांत किमान मूल्यापासून कमाल मूल्यापर्यंत चल बदलत राहतात. एवढ्या कमी काळात हालचाल करू शकतील असे आलेखकच उपलब्ध नसतात.

काळ किमान काही सेकंदांचा असू शकतो. मात्र तेवढ्या काळात, अल्पजीवी (ट्रान्झिअंट) चलबदल पुरता संपून गेलेला असतो. त्याचे मापन मग शक्यच राहत नाही. त्यामुळे अल्पजीवी चलांच्या नोंदींकरता काही नवेच आविष्कार उदयास आले. जंबुपार आलेखक (अल्ट्राव्हायोलेट रेकॉर्डर) हा त्यातलाच एक आविष्कार होता.


सामान्य कागदपट्टा आलेखकात कागद विविक्षित गतीने पुढे सरकत राहतो. चलाच्या प्रमाणात त्या कागदाच्या रुंदीवर आपले स्थान निश्चित करत लेखणीही




सामान्य कागदपट्टा आलेखक (स्ट्रिपचार्ट रेकॉर्डर), उभ्या-आडव्या रेषांकीत कागदांवर चलांच्या प्रमाणात लेखणीस फिरवून आलेख तयार करत असतात. किमान मूल्यदर्शक रेषेपासून (डाव्या बाजूची शेवटली उभी रेषा) कमाल मूल्यदर्शक रेषेपर्यंत (उजव्या बाजूची शेवटली उभी रेषा) यांत्रिकरीत्या लेखणी फिरवायला लागणारा

फिरत राहते. कागदाची लांबी ही काळाशी प्रमाणबद्ध असते. तर कागदाची रुंदी मोजल्या जात असलेल्या चलाशी प्रमाणबद्ध असते. अल्पजीवी (ट्रान्झिअंट) चलांकरता लेखणीही अति शीघ्रगतीने फिरणारी असावी लागते. जंबुपार आलेखकात, मोजला जाणारा चल एका अक्षास स्वतःभोवतीच वर्तुळाकार फिरवतो. त्या

अक्षावर आरसा जडवलेला असतो. तो आरसा जंबुपार प्रकाश शलाकेस परावर्तित करतो. परावर्तित शलाका मग कागदावर आलेख लिहिते. कागद जंबुपार प्रकाशास संवेदनशील असतो. मात्र त्यावर शलाका फिरल्यावर तो उमटतो जरूर, पण अदृश्य असतो. कागदावर ट्यूबलाईटचा प्रकाश पडल्यावर आलेख हळूहळू दृश्यमान होऊ लागतो. जंबुपार आलेखकाची आकृती पुढे दिलेली आहे. त्यावरून हे स्पष्ट होईलच.




जंबुपार आलेखक
(अल्ट्राव्हायोलेट रेकॉर्डर)

चुंबकात फिरणाऱ्या तारवलयांतून चलाच्या प्रमाणात असलेला विद्युत प्रवाह पाठवण्यात येतो. वलयाच्या अक्षास गोल फिरवणारे बळ त्यामुळे प्राप्त होते. बळ कार्यरत असेपर्यंत अक्ष फिरलेल्या अवस्थेतच राहतो. नंतर त्याला पूर्वपदावर आणणारे वंचकवलय (कुंडलाकार स्प्रिंग) अक्षास मूळपदावर घेऊन येते. अक्षास विशिष्ट ठिकाणी आरसे बसवलेले असतात. ते आरसे जंबुपार प्रकाशाच्या स्रोतापासून येणाऱ्या, व्यासनियंत्रित जंबुपारप्रकाश शलाका, संवेदक कागदावर वळवतात. कागद विविक्षित गतीने समोर सरकत असल्याने त्या शलाका आलेख उमटवतात. कागदाच्या रुंदीतील त्या आलेखाचे स्थान चलाच्या प्रमाणाशी सुसंगत राहते. आकृतीत जरी अशा दोन शलाका दाखवलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात दहा चलांची नोंद करण्याची सुविधा त्या आलेखकात होती.

१९८५ च्या सुमारास, माझ्या कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणून मी, चेन्नई अणुऊर्जा संयंत्रातील (एम.ए.पी.एस., मद्रास ॲटॉमिक पॉवर स्टेशन) ‘भारावरोहण चाचण्यांशी (लोड-थ्रो-टेस्ट)’ संबंधित मापनांवर काम करत असे. तेव्हा अणुऊर्जा खात्याने असा निर्णय घेतला की, भाभा अणु संशोधन केंद्राने एक जंबुपार आलेखक घ्यावा आणि भारावरोहण चाचण्यांकरता चेन्नई अणुऊर्जा संयंत्रास तो उपयोगार्थ उपलब्ध करवून द्यावा. जंबुपार आलेखक अणुऊर्जाविभागाच्या ताब्यात आला तेव्हा मी या प्रकल्पात नुकताच रुजू झालेलो होतो. भाभा अणु संशोधन केंद्राच्या प्रशिक्षणशाळेतून वर्षभराचे आण्विकी अभियंत्रज्ञानाचे प्रशिक्षण संपवून, अणुभट्टी अभियांत्रिकी प्रभागात रूजू झालेला नवा उपकरणन अभियंता (इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर) होतो. त्यामुळे जंबुपार आलेखकाचा अभ्यास करून त्यावर चेन्नई अणुऊर्जा संयंत्रातील भारावरोहण चाचण्यांत चलबदलांची नोंद प्रत्यक्षात करण्याचे काम मला सोपवण्यात आले.

जंबुपार आलेखक आलेला होता. त्याच्या उपयोग पुस्तिका हजर होत्या. मात्र तो चालवायचा कसा हे माझे मलाच शिकावे लागणार होते. मी त्याचे रंगरूप, कळा, खुंट्या, चालू-बंद करण्याच्या पद्धती, आलेख

अपयश आणि यश या दोन्ही बाबतींत लोकं आपल्याशी चर्चा करतील
यशाची प्रेरणा म्हणून आणि अयशस्वी होण्यापासूनचे शिकतील!

कागद, इत्यादी परिचालन संबंधी माहिती घेण्यास सुरुवात केली. माझे ज्येष्ठ मार्गदर्शक अभियंते मला यात मदत करत असत. आलेखकात प्रकाशचित्रक कागदावर (फोटोग्राफिक पेपर) जंबुपार प्रकाश-शलाकेने आलेख उमटवला जात असे. आलेखाचा कागद सुमारे २५० मिलिमीटर रुंद आणि अनेक मीटर लांबीच्या गुंडाळ्यांच्या स्वरूपात आलेखकात भरलेला असे. गुंडाळीच्या एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंत चलबदलाचा व्याप पसरलेला असे. बदलत्या चलातील किमान मूल्यापासून तर कमाल मूल्यापर्यंतचा बदल, जंबुपार प्रकाशाची शलाका गुंडाळीच्या एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंत फिरवून नोंदवता येत असे. एकाच वेळी असे दहा चल एकाच कागदावर नोंदवता येत. त्यामुळे काळासंदर्भात त्यांचे परस्परसापेक्ष बदलही प्रयोगानंतर न्याहाळता येत असत. आलेखकातील नोंद सुरू करण्याची कळ दाबताच गुंडाळीतील कागद सेकंदाला तीन मीटर या एकसारख्या गतीने आलेखकाच्या बाहेर फेकला जात असे. संपूर्ण दहा-पंधरा मीटर कागदाची गुंडाळी बाहेर पडली की, किंवा नियोजित अल्पावधीने आलेखनप्रक्रिया आपोआप समाप्त होत असे. यादरम्यान सर्व चलांचे आलेख निरनिराळ्या दहा यंत्रणांद्वारे त्यावर फिरत राहत. लेखन जंबुपार प्रकाश शलाकेने होत असल्याने, कागद बाहेर पडे तेव्हा त्यावर काहीच उमटलेले नसे. बाहेर पडणारा कागद अलगद उतरवून जमिनीवर पसरण्याकरता आलेखकाच्या दोन्ही बाजूस दोन माणसे उभी राहून तो उतरवून घेत असत. आलेखका समोरच्या अनेक मीटरपर्यंत सरळच जमिनीवर पसरून मांडला जात असे. नियंत्रण कक्षातील ट्यूबलाईटच्या प्रकाशात, जंबुपार शलाकेचा प्रभाव विकसित होऊन, थोड्या वेळाने उमटू लागत असे.

अणुऊर्जा संयंत्र इतर ऊर्जा संयंत्रांप्रमाणे आपल्या इच्छेनुसार चालू किंवा बंद करता येत नाही. बंद केले किंवा चुकूनही बंद झाले तरी त्यातील अणुइंधन (युरेनियम) सत्त्वर 'विझत' नाही. ते उष्णता निर्माण करतच राहते. ती सतत बाहेर काढून घेतली नाही तर, इंधनात उष्णताप्रकोप होऊन ते वितळू शकते. असे झाल्यास तो अत्यंत मोठा अपघात ठरत असतो. तो तसा होऊच देत नाहीत. त्याकरता अणुइंधन 'विझण्यास' लागणारा वेळ त्यास दिला जातो. त्यामुळे विद्युतभार कमी जास्त झाल्यास त्यानुसार अणुऊर्जा संयंत्र बंद-चालू करता येत नाही. करतही नाहीत. मात्र अशा प्रसंगी, नियंत्रण कमी होऊन संयंत्र आपोआप बंद पडण्याची (ट्रिप होण्याची) शक्यता असते. असे आपोआप बंद पडल्यास कोणतेही नुकसान होऊ नये याकरता काही चाचण्या पार पाडाव्या लागतात. हेतुतः संयंत्र अचानकच बंद करून विद्युतभार कमी होण्यासारखी परिस्थिती निर्माण करतात. अशा प्रसंगी संयंत्राचे म्हणजे त्यातील कळीच्या चलांचे वर्तन नोंदवण्याकरताच जंबुपार आलेखक उपयोगात आणलेला होता.

अणुइंधनाभोवतीच्या प्राथमिक मंडलातील शीतकाचे म्हणजेच जड पाण्याचे तापमान, त्याचा दाब, द्वितियक मंडलातील वाफेचे तापमान, तिचा दाब, दोन्हीही मंडलातील शीतकांचा प्रवाह, उत्कलकातील (बॉयलरमधील) पाण्याची पातळी, अणुभट्टीतील जड पाणी विमंदकाची (मॉडरेटर ची) पातळी इत्यादी दहा चल जंबुपार आलेखकास जोडलेले असत. संयंत्र अचानकच बंद केले जाई. नियोजित कार्यक्रमानुसार आलेखक आपोआप सुरू होऊन विविक्षित कालावधीनंतर आपोआपच बंदही होत असे. मग ट्युबलाईटच्या प्रकाशात दहाही आलेख उमटून दृश्यमान होऊ लागण्यास कागद प्रकाशास खुला ठेवला जात असे. जसजसे आलेख दिसू लागत तसतसे संयंत्रचालनाशी संबंधित दहाबारा अभियंते प्रयोगाच्या यशापयशाचे मूल्यमापन करू लागत. आलेखांच्या

उमटण्याबाबतची तांत्रिक माहिती मी त्यांना पुरवत असे. आलेखांचे सांगणे समजून घेऊन, मग हे अभियंते नियंत्रण कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना ती माहिती पुरवत असत. भारावरोहण चाचणीचे निष्कर्ष ते अधिकारी मग अणुऊर्जा खात्यातील निर्णयकर्त्यांना कळवत असत. आवश्यकतेनुसार अधिक चाचण्यांचे, त्यातील चलांच्या अदलाबदलीचे निर्णय झपाट्याने घेतले जात. ते बदल मला पुढील चाचणीकरता अंमलात आणावे लागत असत.

'भारावरोहण चाचणी'ची वेळ अनिश्चित असे. संपूर्ण संयंत्राची स्थिती प्रयोगास धार्जिणी करण्याचे प्रयास रात्रंदिवस चालत असत. समजा रात्री तीन वाजता संयंत्र प्रयोगास तयार होते आहे असे लक्षात आले, तर मला आणि माझ्या चमूला रात्री दोन वाजताच आमच्या गेस्टहाऊसमधून विशेष वाहनव्यवस्था करून संयंत्रात आणले जाई. आम्ही प्रत्यक्षात प्रयोग घडवत असू. वस्तुतः काही सेकंदात संपूर्ण आलेखन पूर्ण होऊ शकत असे. मात्र पूर्वतयारी, विशेष आकलन करणाऱ्या अधिकाऱ्यांची ने-आण जुळवून आणण्यात तासचेतास जात असत.

खूप उत्तेजना निर्माण होत असे. सर्व ठीक पार पडेल याची शाश्वती नसे. होणारे बिघाड सत्त्वर दुरुस्त करावे लागत असत. तसे कुशल मनुष्यबळ सतत कार्यरत किंवा उपलब्ध ठेवले जात असे. आज कोणत्याही चलाचे मापन अंकित (डिजिटल) पद्धतीने सूक्ष्मसेकंदाच्या कालावधीतही लिखित स्वरूपात सहज तयार करता येते. त्यामुळे त्यावेळच्या त्या उत्तेजनेची कल्पना आज येणे शक्यच नाही. मी हे सारे करत होतो तेव्हा अत्यंत यांत्रिकपणे सर्व हाताळत असे. जनसामान्यांना जाणून घ्यावे असे या प्रक्रियेत काही असू शकेल, असे मला कधीच वाटले नाही. त्यामुळे ही प्रक्रिया नोंदवून, किमान लिहून ठेवावी असे भान नव्हते. पुढे अवकाश प्राप्त झाल्यावर मला असे जाणवू लागले की, जनसामान्यांनाही हे सारे कसे काय होत असेल, असे कुतूहल नक्कीच वाटत असणार. ती माहिती जाणकारांखेरीज देऊ तरी कोण शकणार? आणि ते जाणकार तरी कोण असतात? आमच्यासारखे अभियंतेच ना? या विचाराने मग मी हे सारे शब्दबद्ध केले. मला आशा आहे की, हा प्रयास तुम्हा सगळ्यांना आवडेल.

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

## *विस्मरणातल्या म्हणी*


- आंधळ्याशी जग सारेची आंधळे.
- आंधळ्या सासऱ्याची लाज ती कशाची?
- आंबलेला भात ताकाने गोड,
  नावडती बायको लेकाने गोड.
- आंब्याची गरज आमसुलाने नाही पुरवत.
- आईचा काळ, बायकोचा मवाळ.
- आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दातावर.
- आठवणीला गोमेसारखे शंभर पाय असतात.
- आठशे आड आणि नऊशे चहाड.
- आडो माडो समुद्रासारखा वाढो.

# 'आयसी ८१४ - द कंदाहार हायजॅक' : वेबसिरीज

*'आयसी ८१४ - द कंदाहार हायजॅक' ही वेबसिरीज सध्या खूप गाजत आहे. कंदाहार येथे भारतीय विमानाचे हायजॅक या विषयावर ही वेबसिरीज आहे. 'फ्लाईट इनटू फियर: द कॅप्टन्स स्टोरी' या IC ८१४ या उड्डाणाचे मुख्य वैमानिक देवी शरण आणि पत्रकार श्रींजय चौधरी यांच्या पुस्तकावर आधारित ही नेटफ्लिक्सवरील मालिका आहे. या वेबसिरीजचे विश्लेषण करणारा लेख : संपादक*

'आयसी ८१४ - द कंदाहार हायजॅक' - आघाडी सरकाराच्या काळातील देशाच्या दुर्दैवाच्या दशावतारांपैकी एक कहाणी जरूर पहा. तुम्हाला २०१४ पासून केंद्रात असलेल्या सरकारचे महत्त्व पटेल.

इंडियन एअरलाईन्सच्या काठमांडूहून दिल्लीला येणाऱ्या विमानाचे अपहरण असो, की मुंबईतले बॉम्बस्फोट असोत; ही विविध सरकारी अधिकाऱ्यांच्या अक्षम्य हलगर्जीपणाची आणि त्यांच्यातील भ्रष्टाचाराची लाजीरवाणी उदाहरणे आहेत. शिवाय दोन्ही उदाहरणांमधून भारत सरकारची इज्जत जगाच्या वेशीवर टांगली गेली होती व त्या हेतूनेच हे सारे घडवले गेले होते हा आणखी वेगळा भाग. त्यापूर्वीचे रुबिया अपहरण प्रकरण व अशा अन्य अनेक निराशाजनक उदाहरणांची मालिकाच उभी करता येईल.



अनुभव सिन्हावर उल्लेख केलेल्या विमान अपहरण प्रकरणावर मालिका बनवणार म्हटल्यावर वेगळीच शंका आली होती. मात्र येथे एक उत्तम मालिका बनवून त्याने वेगळ्या अर्थाने आश्चर्याचा धक्का दिला आहे. त्याबरोबर या मालिकेच्या मर्यादा व दोष देखील लक्षात घ्यावे लागतील. मात्र ते मुख्यत्वे या मालिकेसाठी ज्या पुस्तकाचा आधार घेतला गेला आहे त्याचे आहेत. तो दोष अनुभव सिन्हाच्या माथ्यावर मारता येईल का, याबाबत शंका आहे. या संदर्भात एक उदाहरण द्यायचे तर 'क्सिडेंटल प्राईम मिनिस्टर' या चित्रपटाचे. संजय बारू यांना डॉ. मनमोहन सिंग कसे दिसले याचे ते चित्रण आहे. त्यामुळे ते प्रत्यक्षात 'खाली मुंडी, पाताळ धुंडी' मौनीबाबा कसे होते आणि त्यांच्यामुळे देशाचे अपरिमित नुकसान कसे झाले, हा भाग त्यात येणे शक्य नव्हते. या मर्यादा लक्षात घेतल्या आणि वस्तुस्थितीचे भान राखले तर तो एक चांगला चित्रपट होता असे म्हणता येते. संजय बारू हे पत्रकारदेखील आहेत. तेव्हा त्यांनी आपल्या या कौशल्यावर आधारित मौनीबाबांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन का केले नाही, हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहतो आणि त्यामुळे हा चित्रपट निव्वळ अर्धवट माहितीवर आधारित आहे असे म्हणावे लागते. ते मूल्यमापन तसे केले असते, तर मौनीबाबांची पिसे काढावी लागली असती, अशी भीती त्यांना वाटली असेल का? हे सारे त्यामुळे अंदाजच ठरतात.

तर पुन्हा अनुभव सिन्हा यांच्या मालिकेकडे. 'फ्लाईट इनटू फियर: द कॅप्टन्स स्टोरी' या IC८१४ या उड्डाणाचे मुख्य वैमानिक देवी शरण आणि पत्रकार श्रींजय चौधरी यांच्या पुस्तकावर आधारित ही

नेटफ्लिक्सवरील मालिका आहे. या व्यतिरिक्त एका परदेशी पत्रकाराचीही मदत घेतली गेली आहे. केवळ एका वैमानिकाला 'आतली' माहिती कशी मिळाली असेल या प्रश्नाचे उत्तर या त्रिकुटामध्ये आहे. ही मालिका पाहताना आणखी एका गोष्टीचे भान ठेवणे गरजेचे आहे. ते म्हणजे बोगस हिरोगिरी करत आपल्या भावना उचंबळवणारा देवगण – धाकटा बच्चन या कंपूचा 'जमीन' हा छपरी चित्रपट निव्वळ बकवास असतो. आणि ही मालिका ही वास्तवाला धरून असते. हिरोगिरी न करता आपल्या विमानातील प्रवाशांची जबाबदारी आपली आहे हे समजून सर्व प्रकारची मानहानी पत्करून जिवंत राहणारा या मालिकेतील विमानाचा कॅप्टन हा खरा नायक आहे आणि त्याच्या त्याच्या सहकारी कर्मचारीवर्गाचेही तेवढेच मौल्यवान योगदान यात आहे, ही आपल्याला सहजासहजी न समजणारी दारुण वस्तुस्थिती असते.

१९९९च्या अखेरीस घडलेली ही घटना आजच्या तरुण पिढीला माहीत नसण्याची किंवा कोठेतरी केवळ तिचा संदर्भ ऐकला असण्याची शक्यताच अधिक. तिचे गांभीर्य माहीत नसणे स्वाभाविक आहे.

या तरुणांना एकच सांगतो. जम्मु काश्मीरमधील परिस्थिती माहीत नसते असे बिनडोक लोक भारतीय जनता पक्षाने तेथे मेहबूबा मुफ्तीच्या देशघातकी पक्षाशी युती का केली, हा अर्थात तेवढाच बिनडोक प्रश्न विचारत असतात. या विमानअपहरणाच्या घटनेमध्ये देशाचे परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग हे अतिरेक्याला घेऊन विमानाने गेले आणि त्यामुळे भारताची मान शरमेने खाली झुकली, हे तुमच्या कानावर पडले असेल; नसेल तर नक्की पडेल. मात्र आपली जबाबदारी म्हणून कंदाहारमध्ये अडकलेल्या भारतीय प्रवाशांना आणण्यासाठी ते तिकडे गेले होते. ते गेले नसते तरी काही बिघडले नसते. ज्या अतिरेक्यांना सोडावे लागले, त्यांना वेगळ्या विमानाने नेले असते, तरी या रिकाम्या डोक्यांमध्ये काही प्रकाश पाडण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे या दुष्प्रचाराला अजिबात बळी पडू नका. या मालिकेतही परराष्ट्रमंत्र्यांना यावरून अजिबात दोष दिलेला नाही हे खरोखर विशेष समजायला हवे.




आता या मालिकेच्या मर्यादा आणि या दारुण परिस्थितीतदेखील यात भारतीय म्हणून काही आशा वाटावी असे काय आहे ते सांगतो. त्यापूर्वी अपहरणकर्त्यांपैकी दोघांची नावे शंकर आणि भोला कशी; यावरून 'एक्स'वर काही जणांनी उठवलेल्या राळीबद्दल. या दोघांची ही नावे; तसेच चीफ, डॉक्टर आणि बर्गर ही नावे त्यांनी विमानात असताना एकमेकांना हाक मारण्यासाठीची होती. ते सर्व इस्लामी व पाकिस्तानी दहशतवादीच होते आणि ते लपवलेले नाही. त्यामुळे यावरून घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करा. इंदिरा गांधींची अटकेतून सुटका करण्यासाठी अपहरण केलेल्या विमानाचा एक अपहरणकर्ता काँग्रेसी भोला पांडे होता; त्याचा व या भोलाचा संबंध नाही. विमानचालक देवी शरण यांनी स्वतः सांगितल्याप्रमाणे ज्या प्रमुख अपहरणकर्त्याने त्यांच्या मानेवर पिस्तूल ठेवून जखम केली होती, त्यानेच अखेरच्या दिवशी आपल्याला मिठी मारून त्याबाबत माफी मागितली होती. अखेरच्या दिवशी तर प्रवासी आणि अपहरणकर्त्यांपैकी एकदोघे एकत्र अंताक्षरी खेळत होते. हे अतर्क्य वाटले तरी असे घडतं असते व घडले. विमान दुबईत उतरल्यावर दुबई सरकारच्या वतीने बोलणारा

इसम पाकिस्तानी असतो व तो जसवंतसिंग यांनी दुबई सरकारला केलेल्या विनंतीप्रमाणे काही प्रवाशांची सुटका करण्यासाठी प्रयत्न करण्यास बाध्य असतो, हे लक्षात घेतल्यास यात पाकिस्तानला दोषमुक्त करण्याचा प्रकार नाही हे कळू शकते. तेव्हा अशा आक्षेपांकडे दुर्लक्ष करता येते.

अपहरणनाट्य चालू असताना देशातले विरोधी पक्ष नेते काय प्रतिक्रिया देतात व पंतप्रधान वाजपेयी व गृहमंत्री आडवाणी काय करतात हे न दाखवता हे नाट्य केवळ परराष्ट्रमंत्र्यांच्या पातळीवर हाताळल्याचे दाखवले आहे.

त्या काळामध्ये आजचा सोशल मीडिया नसून केवळ खासगी टीव्ही वाहिन्या होत्या. या विमानात अडकलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांच्या अतिशय आक्रस्ताळ्या प्रतिक्रिया या वाहिन्यांवर सतत दाखवण्यामुळे केंद्र सरकारवरील दडपण वाढले होते. या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रातील बातम्यांचे मथळे देण्याबाबत संयम पाळणारी एक महिला संपादक या मालिकेत दाखवली जाणे हा सुखद धक्का ठरतो. या अतिरेक्यांना सोडले की लगेचच देशविरोधी कारवाया चालू करून निरपराधांच्या व आपल्या सुरक्षा दलांच्या जवानांच्या हत्यांची मालिका (पुन्हा) सुरू होणार हे वास्तव पाहता लष्करी पार्श्वभूमी असलेल्या आणि तसे काही नसलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांच्या प्रतिक्रियांमधील विरोधाभास लगेच कळू शकतो.



या विमान अपहरणकटात पाकिस्तानचा सक्रिय सहभाग असला तरी एकदा विमान कंदाहारला पोहोचले की सारे नियंत्रण आयएसआयकडून तालिबानकडे जाते. तालिबान सरकारदेखील एकजिनसी नसल्यामुळे अखेर अगदी ओसामा बिन लादेनचा देखील हस्तक्षेप यात झाला. मात्र सुरुवातीच्या वाटाघाटींमध्ये आयएसआयचे सदस्य हजर होते हा तपशील दाखवण्यात आलेला दिसत नाही.

मुळात या सर्व प्रकरणातील तालिबानचा सहभाग हा स्वतंत्र विषय आहे. एकीकडे भारत सरकारने तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही आणि दुसरीकडे भारतीय अधिकारी त्यांच्याच भूमीवर त्यांच्याशी चर्चा करत आहेत; अशी विचित्र परिस्थिती. तुमचा या अपहरणनाट्यात काहीच सहभाग नव्हता; तर मग मुळात विमान काबुलऐवजी कंदाहारसारख्या फारशी वर्दळ नसलेल्या विमानतळावर उतरवले गेल्यावर जवळजवळ दोनशे लोकांच्या खाण्यापिण्याची सोय तुम्ही लगेच कशी केली? एका परदेशी महिला पत्रकाराच्या या प्रश्नावर तालिबानचा तेथील प्रवक्ता सपशेल निरूत्तर होतो. तेथून विमानाचे पुन्हा उड्डाण होऊ देऊ नये आणि कंदाहारमध्ये काही रक्तपात होऊ नये, एवढाच आमचा हेतू होता आणि आम्हाला पाकिस्तानी अपहरणकर्ते आमच्या भूमीवर असलेले नको होते; त्यामुळे नंतर ते कोठे (पाकिस्तानमध्ये) गेले याच्याशी आमचा काही संबंध नव्हता, असे या काळातील तालिबानी मंत्री वकील अहमद मुत्तावकील याने या घटनेनंतर दहा वर्षांनंतरही सांगितले.

प्रवाशांच्या नातेवाईकांच्या आंदोलनाचा वर उल्लेख केला आहे. या आंदोलनाचे रूपांतर लवकरच शोकातून बीभत्सपणात झाले. या नातेवाईकांना कम्युनिस्टांनी आणि काँग्रेसने खतपाणी घातले. मुळातच या आंदोलनाला राजकारण्यांनी खतपाणी घालण्याचा प्रकार का दाखवला

नाही, याबाबत अनुभवला विचारता येईल. कारगिल युद्धातील हवाई दलाचा हुतात्मा अजय अहुजा याच्या पत्नीने या नातेवाईकांना समजवण्याचा प्रयत्न केला की, या दहशतवाद्यांना सोडून देण्याचे कोणते गंभीर परिणाम होऊ शकतात. मात्र तिचादेखील अपमान करण्यापर्यंत या पिसाळलेल्या हलकट नातेवाईकांची मजल गेली. त्यांच्यापैकी एका दळभद्र्याचा प्रश्न काय होता; तर रुबिया अपहरण प्रकरणात तिच्या सुटकेसाठी तुम्ही दहशतवाद्यांना सोडले होते; तर आताही का सोडत नाही? देशासाठी हौतात्म्य पत्करण्याची जबाबदारी केवळ सुरक्षा यंत्रणांचीच का असावी, नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखायला हवी, हा महत्त्वाचा मुद्दा येथे मांडला आहे; परंतु तो पुरेसा अधोरेखीत झालेला नाही. हुतात्म्यांच्या त्या पत्नीने त्या परिस्थितीत स्वतःचे डोके फोडून घेतले असते तर या नातेवाईकांची डोकी थाऱ्यावर आली असती का, हा प्रश्न पडतो. आपला मुलगा देशसेवेत धारातीर्थी पडला तर माझा आणखी एक मुलगा मी देशासाठी देईन, असे म्हणणाऱ्या हुतात्म्यांच्या माता आणि तसे करू न शकणाऱ्या सामान्य नागरिकांच्या माता किंवा त्यांचे कुटुंबीय यांच्या विचार करण्याच्या पद्धतीतील फरक समजून घेता येतो. मात्र येथे घडलेल्या बीभत्स प्रकाराला बळी न पडता जसवंतसिंग मोठ्या धैर्याने अखेरपर्यंत अन्य पर्यायांचा विचार करत राहिले. विमान इंधन भरून घेण्यासाठी अमृतसर विमानतळावर उतरल्यावर अशा आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड कसे द्यावे याचा विचार करणारे कोणीच तेथे नव्हते. अखेर विमान लगेच पुन्हा उडू नये याकरता स्वतः जसवंतसिंगांना विमानतळावर फोन करून एक साधा टँकर किंवा अगदी एखादा रोडरोलर तरी अपहरणकर्त्यांची समजूत पटण्यासाठी अंधारात विमानाजवळ न्या आणि त्या दहशतवाद्यांना आणखी थोडा वेळ गुंतवून ठेवा, अशी विनंती करण्याची लाजीरवाणी वेळ आली होती. यातला थोडाच भाग या मालिकेत आला आहे. म्हणून म्हटले की, तशा विपरीत परिस्थितीमध्येही काम करणाऱ्या जसवंतसिंग यांच्यावर वर उल्लेख केल्याप्रमाणे कोणी आरोप करू धजत असेल, तर त्याची लायकी जोड्याने मार देण्याचीच आहे हे आजच्या पिढीने पक्के लक्षात ठेवावे.

पंतप्रधानांचे तेव्हाचे सुरक्षा सल्लागार ब्रजेश मिश्रा त्या पदासाठी कितपत पात्र होते हा प्रश्न नेहमीच चर्चिला गेला आहे. आजचे सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांच्यासमोर ते फारच केविलवाणे होते. संपूर्ण मालिकेत ब्रजेश मिश्रा यांचे एकदा दर्शन होते; तरी त्यांच्या एकूण 'कर्तृत्वाचे' दर्शन घडत नाही. खरोखर दुर्दैवाची बाब ही की, विविध यंत्रणांमधील सुसुत्रतेच्या अभावाचा तमाशा पुढे मुंबईत २६/११ची तेवढीच लाजिरवाणी घटना घडेपर्यंत; म्हणजे २००८पर्यंत चालला.

म्हटलेना की, या विपरीत परिस्थितीमध्येही काही आशेचे किरण दिसतात. एक म्हणजे परराष्ट्रमंत्री जसवंत सिंग यांचे धीरोदात्त वर्तन आणि दुसरे म्हणजे, एरवी एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्या विविध सरकारी सुरक्षा यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची अपहरणकर्त्यांशी वाटाघाटी करताना दिसलेली क्षमता. या वाटाघाटींमध्ये अजित दोभाल आणि अमरजितसिंग दुलत यांचा सहभाग होता. अर्थात त्यांची नावे प्रत्यक्षात दाखवलेली नाहीत. परराष्ट्रमंत्र्यांपासून कोणाचीच खरी नावे घेतलेली नाहीत. या यंत्रणांमध्ये अपेक्षित असलेला सुसूत्रपणा आधीच दिसला असता तर त्या काळात पाकिस्तानी कारवायांच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असलेल्या काठमांडू विमानतळावर ती दुर्दैवी घटना घडलीच नसती. या साऱ्यातला दुर्दैवाचा भाग हा. सीमेवरील अतिशय महत्त्वाचा विमानतळ असलेल्या अमृतसरमध्ये तसा तमाशा घडलाच नसता. पण हे झाले जर-तरचे.

---

आयुष्यात कितीही जखमा झाल्या तरी कधीही निराश होऊ नका
कारण सूर्यकिरणे कितीही चटके देत असली, तरी समुद्र कधीही कोरडा होत नाही.

अपहरण करण्याच्या मार्गाने भारत सरकारला वेठीला धरणाऱ्या अतिरेक्यांबद्दल देश म्हणून आपले धोरण काय असावे, हा प्रश्न त्यावेळच्या आघाडी सरकारांमुळे पडणे शक्य नव्हते. वर उल्लेख केलेल्या रुबिया सय्यदच्या १९८९मधील अपहरण प्रकरणाबद्दल वाचा. म्हणजे सरकारला वेठीला धरण्याचे प्रकार किती सहज घडवून आणता येत होते हे कळू शकेल. अमेरिका व इजरायल दहशतवाद्यांशी तडजोड करत नाहीत असे सांगितले जात असले, तरी ते सर्वस्वी खरे नाही हे लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे अपहरणकर्त्यांशी चर्चा केली जाणार नाही अशी भूमिका पंतप्रधांनानी सुरुवातीला जाहीर केली, तरी इथल्या विरोधी पक्षांचा त्यास एकमुखी पाठिंबा न मिळण्याने दोनशे निरपराध नागरी प्रवाशांचे प्राण वाचवण्यास केवढे महत्त्व प्राप्त होते, हा भाग लक्षात घ्यायला हवा.

सुटका करण्यास भाग पडलेल्या अजहर मसूदने नंतर अपेक्षेप्रमाणे भरपूर उत्पात घडवून आणला. पुढे २०१६मध्ये भारतीय हवाई दलाने केलेल्या बालाकोटवरील सर्जिकल स्ट्राइकमध्ये तो जबर जखमी झाल्याच्या आणि पुढे पाकिस्तानी लष्कराच्या अतिसुरक्षा व्यवस्थेत असल्याच्या बातम्या येत असत. आता त्याही येत नाहीत. म्हणजे सर्जिकल स्ट्राइक्समध्येच त्याचे काय झाले असेल याचा अंदाज येऊ शकतो. आता पाकिस्तानातील अज्ञात नायक तेथे तुरूंगात असल्याचा देखावा निर्माण केलेल्या हफिझ सईदचा वेध घेतील, तेव्हा भारतीयांच्या मनावरचे तब्बल सोळा वर्षांचे ओझे उतरेल.

प्रमुख विमानचालकाची भूमिका हैद्राबादच्या विजय वर्माने अतिशय उत्तम पद्धतीने वठवली आहे. ही त्याची आजवरची नि:संशयपणे सर्वोत्तम भूमिका असणार. म्हटले तसे परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग यांची भूमिका कसलेला अभिनेता पंकज कपूर याने वठवली असली, तरी कदाचित पटकथा ज्या पद्धतीने लिहिली आहे; त्यामुळे ती फार प्रभावी ठरत नाही. मनोज पहवा, अरविंद स्वामी, कुमुद मिश्रा आणि दिब्येंदू भट्टाचार्य ही वाटाघाटी करणारी चौकडी पडद्यावर जो अनुभव देते, तो निव्वळ पाहण्यासारखा. हा भाग जेव्हा लिहिला गेला असेल, तेव्हा आपण तेथे हजर असायला हवे होते, असे वाटण्यासारखा. सिनेमॅटोग्राफीमध्ये आणि लिखाणात काही परदेशी मंडळी आहेत. मालिकेच्या उत्तम दर्जामध्ये त्यांचा सहभाग नक्की आहे.

'जसे घडले तसे सांगितले' हा पवित्रा सादरीकरणामध्ये असल्यामुळे त्यात कोठेही कसलाही अभिनिवेश नाही. शिवाय अभिनय चांगला नाही असे देखील त्यामुळे कोणाला वाटू शकेल. मात्र तो सादरीकरणाचा भाग आहे. अगदी प्रवाशांच्या सुटकेचा प्रसंगदेखील अन्य प्रसंगांसारखा सामान्य व ढणाणा पार्श्वसंगीत नसलेला किंवा प्रवाशांच्या अनावर झालेल्या आनंदाच्या भावना न दाखवणारा. म्हटले तसे शोधल्यास कथानकात आणखी दोष, विसंगती किंवा गाळलेल्या महत्त्वाच्या घटना सापडतील. मात्र मालिकेच्या उत्तम गाभ्याला त्याने धक्का लागेल हे संभवत नाही.

म्हटले तसे भारताच्या दुर्दैवाच्या दशावतारांपैकी एक कहाणी असली आणि पुढे काय होणार आहे हे माहीत असले तरी पाहण्यासारखी, समजून घेण्यासारखी.

**– राजेश कुलकर्णी**
ज्येष्ठ लेखक
मुंबई

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**


# उंटांची अदभूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

**बिकानेर**

मारवाडमध्ये रबारींना रायका असेही म्हणतात. ते लोकसंख्येच्या ३.५% एवढे आहेत. ते उंटांचे खरे प्रजनक आहेत. ते ठामपणे सांगतात की, त्यांचा पहिला पूर्वज महादेवाने पहिल्या उंटाची काळजी घेण्यासाठी निर्माण केला जो पार्वतीने स्वतःच्या करमणुकीसाठी तयार केला होता.

**MAP OF RAJASTHAN**




**(राजस्थान गॅझेट १९०८) – नोव्हेंबर १९९०**

दहा लाखांच्यावर उंट असलेल्या, जगांत तिसऱ्या नंबरची उंटांची लोकसंख्या असलेल्या आपल्या भारत देशांत इल्स संशोधन करायला येते.

ती उंटपालन व त्यांचे आर्थिक व सामाजिक व्यवस्थापन यावर संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करते, तो स्वीकारला जातो.

या विषयावर फारसे संशोधन झालेले नव्हते. तिच्या तुटपुंज्या माहिती प्रमाणे भारतातील उंटपालन हे शेतातील लागवडीसाठीसुद्धा चांगल्या प्रकारे जोडले गेले होते आणि केवळ भटक्या जमातीच नाही तर, शेतकरी देखील उंट पालन करत. तिने प्रस्तावात हा मुद्दा वापरून असा युक्तिवाद केला होता की, भारतीय उंटांची परिस्थिती केवळ अभ्यास करण्यासाठी नाही तर, आफ्रिकन देशांसाठी सुद्धा उपयुक्त धडे देऊ शकते. तिचा अर्ज स्वीकारला गेला व तिला तिचे संशोधन बिकानेर येथील, देशाची मुख्य रिसर्च इंस्टिटूट NRCC - National research Council for Camels यांच्या मार्गदर्शनाखाली करायची परवानगी मिळते. सुदैवाने गॅरीला पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये संशोधन करण्यासाठी फुलब्राईट फेलोशिप मिळते, म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात घर करते व तिच्या मुलांना तेथील स्थानिक शाळेत प्रवेश मिळतो. पुण्याहून राजस्थानला यायचा तिचा विचार असतो. तिच्या क्षेत्रिय कार्यासाठी ( field work) प्रत्यक्ष अनुभवासाठी तिने, भारतीय उंट पालकांबद्दलच्या माहितीसाठी सर्व उपलब्ध स्रोत परिश्रमपूर्वक शोधले. अरबी बदाउनी आणि आफ्रिकन संस्कृतीशी साम्य शोधायचा ती प्रयत्न करते. तिने तुरेग, सोमाली, बदाउनी व रेन्डिले यांच्या विषयी भरपूर वाचलेले असते. हा तर्कशुद्ध निष्कर्ष होता की, भारतात परंपरागत उंट प्रजनन करणारे व उंट पालक असणार, कारण भारतात धंदे पिढीजात असतात व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातीद्वारे हस्तांतरित केले जातात. पण भारतीय उंटांसंबंधीचे साहित्य या विषयावर काहीही भाष्य करत नाही. ती

अनेक अहवाल, ग्रंथ पडताळते. यामधून उंटांची शारीरिक शास्त्रीय माहिती असते.पण एकाही अहवालांत तिला उंट पालनाविषयी, त्यांचा सांस्कृतिक पाया, व्यावहारिक बाजू, उंटांची पैदास कशी केली गेली, त्यांचा वापर कसा होत असे हे समजत नाही. त्यांचे सामाजिक व आर्थिक महत्त्व हे पुष्कळशा साहित्यातून, लेखांतून पुरेसे स्पष्ट नव्हते. फक्त एका संदर्भ ग्रंथात, लेखात तिला राजांच्या वेळेपासून जे उंट पालन करीत त्या रायकाविषयी थोडी माहिती मिळते.

महादेव व पार्वती यांचा संदर्भ तिला फारसा व्यावहारिक व फायद्याचा वाटला नाही व तिने भारतीय संस्कृतीचा अभ्यासही केलेला नसतो.

बिकानेरच्या सीमा रेषेवर असलेले NRCC सेंटर अतिशय प्रभावी व आकर्षक असते. पण बिकानेर शहर खूप लांब व अविकसित असते. तेथे जाण्यासाठी रेल्वे व विमानाचे आरक्षण मिळवायला तिला अनेक महिने लागतात.

शेवटी एका नोव्हेंबरच्या थंडीतल्या सकाळी ती बिकानेरला पोहोचते. रेल्वेस्टेशनपासून तिच्या हॉटेलपर्यंत जायला फक्त घोड्याचा टांगा हे वाहन असते. पण संशोधन केंद्राची अतिशय प्रभावी मांडणी असते. ते सायन्स व तंत्रज्ञान यांचे मंदिर असते.  हे रक्त विश्लेषण करण्यासाठी, जीवरसायनशास्त्रातील मापदंड आणि हार्मोन्सची पातळी तपासण्यासाठी आणि तणाव घटकांचे मोजमाप करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे आणि तांत्रिक उपकरणे विस्तृत प्रयोगशाळेने परिपूर्ण होते. तेथे एक पाचशे उंटांचे शेत असते. त्यांत भारतातील अनेक मात्तब्बर जातींचे उंट प्रतिनिधीत्व करतात. लांब गुंडाळलेल्या कानांचे बिकानेरी, चपळ जैसलमेरी दुधाचा चांगला पुरवठा देणारे पण मंद व सुस्त गुजरातमधील कच्छ मध्ये, ईमरेटस मधून आलेला उंट या सर्वांचे कुबड (hump) चांगले होते. कारण त्यांना पौष्टिक अन्नावर वाढवले जात असणार. तेथे कृत्रिम गर्भधारणा व गर्भ प्रत्यारोपण होत असते.

डायरेक्टर डॉ. खन्ना तिचे मनापासून स्वागत करतात. तिला संपूर्ण केंद्र दाखवतात व तिने रायका व त्यांचे उंट पाहण्याची इच्छा दर्शवल्यावर दुसऱ्या दिवशी एक जीप व पशुवैद्य अनुवादासाठी देतात. ती गधवाला खेड्यात जाते ते बिकानेरपासून काही कि. मी. अंतरावर असते.

बिकानेरचा आजूबाजूचा प्रदेश वाळूच्या महासागराने भरला होता व रस्त्यावर वाळू वर-खाली हेलकावे खात होती. अनेक वाळूचे ढिगारे त्यांनी चुकविले लाटांचा सामना करणाऱ्या ट्रॉलरप्रमाणे जीपने वाळूचा सामना केला. अनेक वाळूंचे डोंगर त्यांनी पार केले. जरी जिकडे-तिकडे झाडे आणि पशुधन ठिपक्याप्रमाणे पसरले होते तरी, ती वाळू म्हणजे बधण्यास असमर्थ करणार पांढरा शुभ्र रंग होता व मातीच्या-विटांच्या घरांच्या स्वच्छ व निर्मळ वाड्यांमध्ये विखुरलेली होती. पांढऱ्या आणि गेरूमधील या ग्रामीण रंग संगतीतील बहुतेक रंग स्त्रियांच्या पोषाखाशी जोडले गेले होते. त्यांच्या डोक्यावर पाण्याचे हंडे कौशल्याने सांभाळत इतर कामास जात होत्या.

जीप एका पारंपरिक कंपाउंडला वेढलेल्या मातीच्या भिंतीजवळ उभी राहिली. ते घर रायकाचे होते ज्याच्या नातेवाईकाने NRCC मध्ये काम केले होते. त्यांनी प्रवेशद्वारातून आत प्रवेश करताच, चारपाईवर डुलकी घेत असलेला एक माणूस घाईघाईने उठला, त्याने पगडी घातली, त्याचे धोतर सारखे केले, आपल्या मोठ्या पांढऱ्या मिशावर परत हात फिरवीत 'राम राम' म्हणून त्यांचे स्वागत केले. उंटांच्या मोठ्या कळपाचा मालक कनाराम अशी त्याची ओळख करून दिली. त्याच्या

झोपडीचे आवार अतिशय स्वच्छ असते. नीट झाडलेल्या अंगणात आणखी दोन चारपाई आणल्या गेल्या. जरी ते आगंतुकपणे आले होते तरी कुठेही वाळूचे कणही नव्हते. तुटलेली भांडी, इतर पसारा नव्हता. सगळं काही संग्रहालयांत असल्या सारखे व्यवस्थित होते. कनाराम व त्याचे दोन भाऊ मिळून त्यांच्यांकडे तीनशे उंट असतात. पण त्यांच्या उंटांचे कळप वीस कि.मी. वर मुक्त फिरत असतात. हे उंट फक्त पाणी पिण्यासाठी जवळच्या विहिरीवर येतात. फक्त पावसाळ्यांत त्यांना एकत्र केले जाते. कारण तेव्हा शेतामध्ये शेती केली जाते. ते चोरीलाही जात नाहीत, कारण त्यांच्यावर त्यांच्या गावाचा शिक्का असतो. एखादे जनावर हरवले तर त्याच्या पायाच्या ठशांवरून त्याला ओळखतात. अशा लोकांना 'पगरी' म्हणतात.

त्यांच्या उंटापैकी ऐंशी टक्के मादी उंट होत्या. त्यांनी नवजात नरांना जन्म दिला की ते पुष्करच्या मेळ्यांत विकतात.

''उंटांच्या दुधाचा उपयोग नाही का करत? असे विचारल्यावर कनाराम सांगतो की, 'हे उंट लांब भटकत असतात. त्यामुळे दुधाचा उपयोग होत नाही व दुधासाठी त्यांच्याकडे गाई-म्हशी असतात' त्यांच्या मांसाचे काय करतात? असे विचारल्यावर तो डॉक्टर म्हणतो की, 'हा प्रश्न चांगला नाही. कारण उंटाचे मांस हे लोक खात नाहीत, कारण ते हिंदू आहेत. हा प्रश्न विचारू नका.' उंटांविषयी त्यांच्या भावना खूप उत्कट आहेत.''

कनाराम सांगतो की, पूर्वी लग्नांत हुंडा म्हणून उंटांना द्यायची पद्धत होती, पण आता ती कोणी पाळत नाही. त्याच्या लग्नांत त्याला एकवीस माद्या व एक नर हुंडा म्हणून मिळालेला असतो.

गधवालाचे रायका बिकानेरच्या महाराजांच्या उंटांचे पालन करत. नंतरच्या काही दिवसांत ती आणखी रायकांच्या वस्त्यांना भेट देते. त्यापैकी एक 'नोख' (Nokh) नावाचे गांव असते. त्या गांवातील रायका तिला सांगतो की, त्यांच्या पूर्वजांनी जयसलमेरच्या महाराजांचे उंट सांभाळले होते. पण तिला रायकांच्या खूप वस्त्या दिसत नाहीत. तिला असेही समजले की, मुस्लीम जमातीला उंटा विषयी खास आकर्षण आहे. ते उंटांचे दूध तीन वेळा काढतात, त्यांच्या शर्यती लावतात व त्यांना नाचायला व नमन करायला शिकवतात. तिची उत्सुकता खूप शिगेला पोहोचते.

ती पहिल्यादांच ऐकते की, उंटपालक त्याच्या मांसाचा उपयोग करत नाहीत. इजिप्तमध्ये उंटाचे मांस स्वस्त असल्यामुळे गरीब लोक त्याला प्राधान्य देतात. हजारांनी उंट तेथे सुदानमधून, चाळीस दिवसाच्या, रस्त्यावरून येतात, जगांतील सर्व उंट पालक त्यांच्या मांसाचा उपयोग करतात.

रायका उंटांचा वापर कसा करतात त्याचे साधारण चित्र तयार होते. उंटांचा उपयोग त्याच्या दुधासाठी फारसा करत नाहीत. जर त्यांच्याकडे गाय, म्हैस नसेल तरच करत. त्याचे मांस खाणे निषिद्ध समजतात. त्याचा उपयोग वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वत्र करतात. उंटांच्या लोकरीचा उपयोग ब्लॅंकेटस्, रजया व दोऱ्या करण्यासाठी करतात. त्याच्या शेणांत वाळू मिसळून सुंदर भिंती तयार करण्यासाठी वापरत. त्यांच्या हाडांचा उपयोग खतांसाठी व चामडीचा उपयोग वेगवेगळ्या आकारांची भांडी करण्यासाठी करत. पण रायका फक्त उंटांचे पालन व प्रजनन करतात.

उंटांचा वाहतुकीसाठी केला जाणारा मोठा उपयोग बिकानेरमध्ये व त्याच्या आजूबाजूला दिसून येत होता. दोनचाकी व चारचाकी उंटांनी जोडलेल्या गाड्या हे सर्वव्यापी दृश्य गजबजलेल्या बाजाराच्या ठिकाणी होते. जवळ जवळ सर्वच गोष्टी उंटांच्या गाड्यांवर वाहून

वाईट पाहणे आणि ऐकणे ही वाईट करण्याची सुरुवात आहे.

नेल्या जात होत्या. लाकूडफाटा, गॅस सिलींडर, विटा, चारा, कापडाचे गठ्ठे, लोकर व माणसे.

तिला खूप आश्चर्य वाटले की, उंटांचा उपयोग अन्नासाठी का करत नाहीत? जो उंट पाळण्याचा इतर ठिकाणी मुख्य उद्देश असतो तो पूर्णपणे दुर्लक्षित होता. ती विविध पर्यायांचा विचार करते. कदाचित रायका हिंदू असल्यामुळे आणि त्यांनी त्यांच्या जवळचा प्राणी उंटात ही पवित्र गाईची कल्पना पाहिली असावी की, ते शाकाहारी होते आणि मांस वगैरे खात नव्हते म्हणून. एखादे ऐतिहासिक स्पष्टीकरण किंवा पर्यावरणीय कारण होते का? शिवाय, प्रजनन पद्धतीचे अर्थशास्त्र काय होते? रायका त्यांच्या कळपातून चांगली कमाई करत का? कळपाचा सरासरी आकार केवढा होता? ते दरवर्षी किती उंट विकायचे आणि काय फायदा मिळवायचे?

तिने परत NRCC च्या लायब्ररीत उत्तरे शोधायचा प्रयत्न केला. उंटांवरचे खूपसे साहित्य तांत्रिक व निवडक होते. राजपुतानाच्या आधुनिक पुनर्मुद्रणाच्या गॅझेटसच्या एका मारवाड राज्याच्या खंडामध्ये तिला एक उंटांचे लष्करी महत्त्व सांगणारी नोंद मिळते.

प्राचीन काळापासून या राज्यात, राज्य उंट तोलाची देखभाल करण्यासाठी एक पद्धत प्रचलित आहे, जुन्या दिवसांप्रमाणे इतर वाहतुकीच्या साधनांच्या अभावी उंट मोठ्या संख्येने ठेवणे आवश्यक होते. राज्याचा उंटांचा तोला (उंटांचा कळप) रायकाकडे असे. ज्यांना राज्याच्या पडीक जमीनीवर चरण्याची परवानगी होती. त्या नोंदीमुळे हे निश्चित होते की, रायकाकडे राजाच्या उंटाची काळजी घेण्याचा वारसा होता.

१८८९ ते १८९३ मध्ये बिकानेरच्या गंगासिंग महाराजांनी ५०० उंटांच्या मजबूत सैन्याची तुकडी, गंगा रिसाला स्थापन केली होती. गंगा सिंग, एक अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व, ब्रिटिश युद्ध मंत्रिमंडळात भारताचे प्रतिनिधीत्व केले.

नंतर संध्याकाळी ती गावातून हिंडते. गंगासिंगचा बिकानेरच्या वास्तुकलेवरही ठसा उमटलेला असतो. त्याने केलेली गावाची रचना पुरोगामी व भव्य असते. तिथे योजनाबद्ध मार्ग, सर्कल्स, गावात उद्यान व प्राणी संग्रालय असते. आणि हा भाग आता जवळजवळ रहदारी रहीत होता. मधोमध किंचित दूर असा भव्य जुनागड किल्ला होता, आतमध्ये मोठे आणि भव्यपणे सजवलेल्या महाल किंवा राजवाड्यांचा समूह होता. लाल सँडस्टोनपासून बनवलेल्या भव्य डिझाइनच्या इमारती बिकानेरमधील अनेक अनपेक्षित ठिकाणी उंच कळस आणि बुरुजासह उभ्या होत्या. याउलट, शहराचे नवीन भाग एक असंबद्ध आणि गर्दीने भरलेले शहरी गोंधळाने भरलेले होते, ज्यामध्ये स्कूटर, टांगा, तीन चाकी रिक्षा आणि उंट-गाड्या होत्या.

तिला तिचे संशोधन निरर्थक व असंबद्ध वाटते कारण तिला कुठेही उंटांचे कळप बघायला मिळत नाहीत. फक्त मधूनच दूर अंतरावर भटकणारे उंट दिसतात. ती बिकानेरमध्ये सगळीकडे उंटांच्या गाड्या, जळाऊ लाकडांनी व सर्व प्रकारच्या सामानाने भरलेल्या बघते. उंटांचे प्रजनन करणारा कळप तिला दिसत नाही.

बिकानेरच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातून नुकतीच पदवी घेतलेला, रायकाच्या रूपांत एक आधारवड भेटतो. त्यांचे नाव डॉ. देवाराम देवासी होते आणि ज्यांनी विद्यापीठाचे शिक्षण घेतले होते अशा काही मोजक्या लोकांपैकी तो एक असतो. तो लाजाळू आणि मृदुभाषी असतो. तो मेंढीपालन करणाऱ्या अत्यंत गरीब कुटुंबातील असतो. त्याचे सर्व भाऊ आणि त्यांची कुटुंबे अजूनही त्यांच्या मेंढरांच्या कळपासह स्थलांतर करत होते. मुळात त्याची शाळेत जाण्याची कोणतीही योजना नव्हती, पण

एका शेजाऱ्याने डॉ. देवरामला वर्णमाला शिकवली होती, ज्याचा सराव त्यांने काठीने वाळूत लिहीत शाळा आणि पशुवैद्यकीय महाविद्यालयातून केला होता. प्रचंड संघर्ष करत, त्याच्या कुटुंबावरही मोठा आर्थिक भार पडतो तरीही, तो इतर विद्यार्थ्यांना दूध विकून शिकतो. शहरांत वाढलेल्या पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांपेक्षा त्याचा स्वभाव खूप वेगळा होता. त्याच्या पार्श्वभूमीमुळे आणि त्याच्या सहानुभूतीमुळे, लोक मोकळेपणाने बोलू लागतात, आणि मुलाखती देतात.

रायका उंटांच्या दुधाचा इतका कमी उपयोग का करतात यांचे तो तिला लगेच उत्तर देतो. आम्हां रायकांना दूध विकण्यास सांस्कृतिक बंदी आहे. आमच्यासाठी ती देवाची देणगी आहे. आमच्याकडे जास्त दूध असेल तर ते आम्ही वाटून टाकतो. त्यासाठी पैसे घेत नाही. आमच्या दृष्टीने दूध विकणे म्हणजे स्वतःच्या मुलांना विकण्या सारखे आहे. पण आता परिस्थिती बदलली आहे. आम्ही आमच्या मेंढ्याच्या दुधापासून तूप विकायला सुरवात केली आहे. उंटाचे दूध आम्ही ताजे पितो, तापवत नाही व त्यापासून तूप किंवा दही बनवायला आमच्या जातीत बंदी आहे.

पण दुर्दैवाने डॉ. देवारामचे बिकानेर मधील वास्तव्य संपुष्टांत येते. त्याची राजस्थानमधील साद्री या छोट्याशा गावांत बदली होते. तो इल्सला साद्रीला यायचे निमंत्रण देतो.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पिटल, ठाणे
भ्रमणध्वनी : ९८३३०२९३५६

•••



(पृष्ठ क्र. २ वरून – **संपादकीय**)

जलाशयात अतिशय वेगाने वाढणारी वॉटर हायसिंथ (Water Hyacinth) या वनस्पतीचा आपले जीवन सुकर करण्यासाठी कसा वापर करता येतो हे दाखविण्याचा प्रयत्न या मुलांनी केला होता. पाण्यातील ही वनस्पती काढून तिचा लगदा कसा करायचा आणि त्यापासून वेगवेगळ्या उपयुक्त वस्तू कशा बनविता येतात हे त्यांनी दाखवून दिले. लगद्यापासून बनविलेल्या शोभेच्या वस्तू, पर्स, पिशव्या त्यांनी पद्धतशीरपणे लावून ठेवल्या होत्या. त्याचबरोबर लगद्याचा उपयोग करून त्यांनी काही शीटस् बनविले होते. या शीटजवळ पेटती मेणबत्ती आणून ते अग्नीरोधक असल्याचे ते दाखवत असत. तसेच हे शीटस् उष्णतारोधक असल्याने त्यांच्या मदतीने अतिशय थंडी आणि उष्णतेपासून आपले संरक्षण करणे शक्य आहे हे त्यांनी प्रेक्षकांना पटवून दिले. प्रकल्पाचे महत्त्व आणि मुलांचे उत्तम सादरीकरण यामुळे या प्रकल्पाला उत्तम प्रतिसाद मिळाला. या प्रकल्पापुढे सतत गर्दी पाहायला मिळत असे. पुढच्या वर्षी सहभागी होण्याची कबुली देऊन आम्ही हाँगकाँगचा निरोप घेतला.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

संपूर्ण जगात देवाने फक्त माणसामध्ये हसण्याचा गुण दिला आहे, ही गुणवत्ता गमावू नका.

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**राखी प्रदर्शन –** दि. १२ ऑगस्ट रोजी इ. ५वी ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागातून बनलेल्या 'राखी प्रदर्शनाचे' उद्घाटन आपल्या संस्थेचे विश्वस्त श्री. उत्तम जोशी यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी श्री. रसाळ, शाळेचे पदाधिकारी, शाळेचे वर्ग प्रतिनिधी, पालक व इ. ७वी अ चे विद्यार्थी हजर होते.



**हस्तलिखिते आणि भित्तीपत्रिके –** दि. १५ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी इ. ५वी ते इ. १०वी तील विद्यार्थ्यांनी तयार केलेली हस्तलिखिते व भित्तिपत्रिकांचे प्रकाशन करण्यात आले. ध्वजारोहणासाठी शाळेतील स्काऊट गाईड, तसेच एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.




**सायबर सुरक्षा मार्गदर्शन –** दि. १९ ऑगस्ट रोजी कु. सायली शेलवले व कु. श्रुती राणे या बांदोडकर महाविद्यालयाच्या कॉम्प्यूटर सायन्स विभागाच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी इ. ५ वी ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना 'सायबर सुरक्षा' विषयी मार्गदर्शन केले.



**रक्षाबंधन –** शाळेतील राज्य पुरस्कार गाईड व गाईड कॅप्टन सौ.कल्पना बोरवणकर यांनी वाहतूक पोलिसांना, तसेच स्वच्छता कर्मचारी यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.



**अथर्वशीर्ष पठण –** दि. २३ ऑगस्ट रोजी इ. ६वी, ८वी, १०वी या वर्गांचे अथर्वशीर्ष पठण सौ. क्षमा पाटकर यांनी  करून घेतले.



**काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा –** शनिवार दि. २४ ऑगस्ट' रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे 'एकदा आपणच व्हावे मोर' या कवी मोहन काळे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन इ. ७वी अ मधील विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात

आले. त्यानिमित्ताने या विद्यार्थ्यांना काव्यसंग्रहाची एक प्रत भेट देण्यात आली.



**सायकल फाउंडेशन तर्फे वक्तृत्व स्पर्धा –** रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी 'सायकल प्रेमी फाउंडेशन' च्या वतीने 'सायकल' या विषयावर वक्तृत्व/निबंध/चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. अनय पोतनीस याचा प्रथम क्रमांक, तर यश बोरघरे यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. इ. ५वी ते १०वी च्या एकूण ६८ विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र, तसेच नवीन सायकल खरेदीवर २० टक्के सूट देण्यात आली.



प्रोट्रॅक्ट क्लब ठाणे तर्फे २५ ऑगस्ट रोजी चित्रकला, निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेतून सहभागी सर्व २४ विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आली.

**समूहगायन –** दि. २५ ऑगस्ट रविवार रोजी भारत विकास परिषदेतर्फे आयोजित 'समूहगान' स्पर्धा काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे येथे संपन्न झाली. सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्राप्त झाले.

**महावाचन उत्सव –** CRC अंतर्गत इयत्ता ५वी ते ९वी पर्यंतच्या वर्गातून 'महावाचन उत्सव' साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने एक पुस्तक वाचून त्याबद्दलची माहिती १५०शब्दांत लिहिणे अपेक्षित होते. आपल्या शाळेतून ९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**रोट्रॅक्ट क्लब ठाणे तर्फे रक्षा पत्र स्पर्धा –** रोट्रॅक्ट क्लब ऑफ ठाणे डाऊनटाउन तर्फे दिनांक १२ ऑगस्ट रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी सैनिकांना 'रक्षापत्र' ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून प्रत्येक वर्गातून निवडलेल्या तीन क्रमांकांना ब्रांझ, सिल्व्हर, गोल्ड पदके देण्यात आली.

**सेल्फ डिफेन्स प्रात्यक्षिक –** दि. २९ ऑगस्ट तसेच २ सप्टेंबर २०२४ रोजी 'Versatile Fitness And Martial Arts' या संस्थेमार्फत इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वसंरक्षण' प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. श्री. अनिल कुमार जयस्वाल व त्यांचे सहकारी यांनी स्वसंरक्षणासाठी कोणते उपाय केले पाहिजे यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच प्रत्यक्ष विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतली.



**ग्राहक पंचायत –** सोमवार दि. २ सप्टेंबर रोजी 'मुंबई ग्राहक पंचायत' मार्फत इ.८वी अ च्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्राहकांचे हक्क व अधिकार' या विषयावरील पहिले सत्र सौ. वर्षा भुरके यांनी घेतले व विद्यार्थ्यांना ग्राहकांच्या विविध हक्कांविषयी माहिती देण्यात आली.

**रोड सेफ्टी –** R-Nisarg फाउंडेशन मार्फत प्रारंभ उपक्रमांतर्गत दि.४ इयत्ता ६वी साठी 'रोड सेफ्टी' हा ४ सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम घेतला. R-Nisarg फाउंडेशन

मार्फत प्रारंभ उपक्रमांतर्गत इयत्ता ६वी ८वी समोर 'रोड सेफ्टी' हा कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमातून रोड सेफ्टी का व कोणासाठी आवश्यक असते हे सांगितले. तसेच नृत्याच्या माध्यमातून वाहतुकीचे नियम स्पष्ट केले व त्या संदर्भात विद्यार्थ्यांकडून 'रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा' देखील हणून घेण्यात आली.

**माझी वसुंधरा पारितोषिक –** ''माझी वसुंधरा'' उपक्रमांतर्गत ठाणे महानगरपालिकेकडून आपल्या शाळेला तृतीय क्रमांकाचे ११ हजारांचे पारितोषिक प्राप्त झाले. या उपक्रमासाठी माजी मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे, सौ. सुप्रिया बोरुळकर, सौ. संगीता तातळे, सौ. पूनम देवघरे, संगणक शिक्षिका शितल व पूनम यांनी काम पाहिले होते. विद्या प्रसारक मंडळ, मुख्याध्यापिका कल्पना वाघुले, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी शिपाई विद्यार्थी व पालक यांच्या सहकार्यातून पारितोषिक प्राप्त झाले.



## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### स्वातंत्र्यदिन

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शाळेतील प्राथमिक विभागाच्या इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शाळेच्या परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगण्यात आले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम का करतात ह्याचे महत्त्व सांगितले. लहान मुलांनी देशभक्तिपर गीते गायली आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल छोट्या गोष्टी सादर केल्या. स्वातंत्र्यदिनाच्या परिपाठात विद्यार्थ्यांना देशासाठी लढलेल्या काही महान नेत्यांच्या भाषणांमधून प्रेरणा देण्यात आली. लोकमान्य टिळकांचे विचार सांगितले गेले, ज्यांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' असे म्हणत संपूर्ण देशाला स्वातंत्र्याच्या लढ्यात एकत्र आणले. सुभाषचंद्र बोसांचे ''तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा'' हे प्रेरणादायी उद्गार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यात आले, ज्यामुळे देशभक्तीची भावना निर्माण झाली. भगतसिंग यांच्या त्याग आणि धाडसाचे वर्णन करून ''इन्कलाब जिंदाबाद'' हा घोष विद्यार्थ्यांना ऐकवण्यात आला, ज्याने त्यांच्या मनात देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण केली. या नेत्यांच्या विचारांनी आणि त्यागाने आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या या महान कार्याची जाणीव करून दिली गेली.



### रक्षाबंधन

रक्षाबंधनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी राख्या तयार केल्या आणि त्यांचे महत्त्व समजून घेतले. भाऊ–बहिणींच्या नात्याची सुंदर व्याख्या त्यांनी सादर केली.

भाऊ-बहिणींच्या नात्यातील प्रेम व कर्तव्याची भावना विद्यार्थ्यांना पटवून दिली.



**कृष्ण जन्माष्टमी**

कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी विद्यार्थ्यांनी कृष्णलीला सादर केली आणि मडकी फोड कार्यक्रमात सहभाग घेतला. लहान मुलांनी कृष्णाच्या जीवनाविषयी शाळेत प्रार्थना आणि भगवान कृष्णाच्या जीवनातील शिक्षण आणि त्याचे आध्यात्मिक व सामाजिक महत्त्व समजावले.



या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहभाग उल्लेखनीय होता. यामुळे त्यांच्यामध्ये सांस्कृतिक मूल्यांची रुजवता आली. या सणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यात आले.

**सौ. आनंदीबाई जोशी इंगजी माध्यमिक विभाग**



रुजुला पाटील हिचा TMC तर्फे SSC बोर्डात संस्कृत विषयात १०० गुण मिळाल्याबद्द्ल सत्कार करण्यात आला.

चॅम्पियनचे अभिनंदन !

**जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)**

- विद्या प्रसारक मंडळाच्या के.ग.जोशी कला आणि ना.गो. बेडेकर वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, ठाणे येथे NSS युनिट तर्फे मुंबई विद्यापीठाच्या ठाणे येथील सबकॅम्पस मध्ये दिनांक १ जुलै २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यात एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ६२ रोपे लावण्यात आली.

आदरणीय जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे (IAS) आणि 'मुंबई विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. रवींद्र डी कुलकर्णी' यांच्यासह माननीय प्राचार्य डॉ. (सौ.) सुचित्रा नाईक यांनी वृक्षारोपण करून उद्घाटन केले.

- मंगळवार दिनांक २ जुलै २०२४ रोजी शिक्षकांसाठी फील्ड प्रकल्प कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेला प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी २६ शिक्षक उपस्थित होते. कार्य NEP २०२० अंतर्गत, द्वितीय वर्षाच्या पदवीपूर्व कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमात फील्ड प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे.

- पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे दिनांक ५ जुलै २०२४ रोजी विधानसभेला भेट देण्यात आली. SY आणि TYBAMMC इंग्रजी, मराठी (पत्रकारिता) आणि MACJ भाग II चे एकूण ७०विद्यार्थी यात सहभागी होते. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना विधानसभा आणि विधानपरिषद यांच्या अधिवेशनाची आणि संसदीय कामकाजाची माहिती करून देणे या अनुषंगाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

- पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे मल्टीमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभाग, मुंबई मराठी पत्रकार संघाला दिनांक ५ जुलै २०२४ रोजी भेट

देण्यात आली. TYBAMMC इंग्रजी, मराठी आणि MACJ भाग II याचे एकूण ७० विद्यार्थी यात सहभागी झाले. श्री संदीप चव्हाण, ज्येष्ठ क्रीडा पत्रकार, कु. स्वाती घोसाळकर, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व राजेंद्र हुंजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- DLLE आणि NSS आणि SURGE यांच्या संयुक्त विद्यमाने SURGE या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेचा २२वा स्थापना दिवस रविवार, दिनांक ७ जुलै २०२४ रोजी नवदुर्गा आश्रम (वृद्धाश्रम), बदलापूर येथे ज्येष्ठ नागरिकांसोबत साजरा करण्यात आला. यावेळी श्रीमती उमा भंडारी (नवदुर्गा आश्रमाच्या संस्थापक) यांनी मार्गदर्शन केले. यात महाविद्यालयाच्या १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले.

श्रीमती उमा भंडारी यांच्याशी 'भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा' या विषयावर संवाद साधण्यात आला. नवदुर्गा आश्रमातील २५ वृद्ध व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात आले.

पिंपळ, केळी, अडुळसा, कडुनिंब, लाल आणि गुलाबी हिबिस्कस, सोनचाफा इत्यादी प्रकारच्या रोपांचे रोपण करण्यात आले. सहाय्यक प्रा. स्वप्नील मयेकर यावेळी उपस्थित होते.

- संस्कृत विभागातर्फे दिनांक ६ जुलै २०२४ रोजी महाकवी कालिदास दिन साजरा करण्यात आला. कालिदासांच्या प्रती कृतज्ञता त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून, भारतीय तत्त्वज्ञान, भारताच्या समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणे या दृष्टीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- B.Com विभाग (लेखा व वित्त) विभागातर्फे NEP संवेदीकरण सत्र - FYBAF साठी दिनांक ११ जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आले होते. उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी एकूण ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल आणि B.Voc (विक्री आणि विपणन व्यवस्थापन) विभागातर्फे 'जागतिक युवा कौशल्य दिन २०२४' चे आयोजन सोमवार, दिनांक १५ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते. यात एकूण १४४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल आणि B.Voc (विक्री आणि व्यवस्थापन) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

- अतुल्य सर्वसमावेशक सेल तर्फे जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून 'फिंगर प्रिंट्सद्वारे ग्रीटिंग कार्ड बनवणे' या उपक्रमाचे आयोजन दिनांक १५ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते. कु.मानसी पाटील हिने यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूण १५ विद्यार्थी व ८ स्वयंसेवकांनी यात सहभाग घेतला.

- सर्वसमावेशकता आणि कौशल्य विकासाला चालना देणारे, ग्रीटिंग्ज कार्डमध्ये रूपांतरित केलेल्या कलाकृती तयार करणे. कौशल्य क्रियाकलापातून उत्पन्नाचा स्रोत म्हणून निर्माण करणे यातून सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी URGE ने कौशल्य दिन कार्यशाळेला भेट दिल्यानंतर १०० कार्ड्सची ऑर्डर दिली.

- B.Com विभाग (बँकिंग आणि विमा) तर्फे ५५वा बँक राष्ट्रीयीकरण दिवस (NEP २०२० विद्यार्थी केंद्रित संवाद) दिनांक १९ जुलै २०२४ रोजी साजरा करण्यात आला. यात एकूण १११ विद्यार्थी सहभागी झाले.

- वाणिज्य विभागातर्फे प्रथम वर्ष (सेल्फ फायनान्स) इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १९ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते. प्राचार्या डॉ.(सौ.) सुचित्रा नाईक यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यात एकूण ४११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- सर्ज या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेतर्फे गुरुपौर्णिमा उत्सव सोहळा दिनांक २० जुलै २०२४ रोजी संपन्न झाला. यावेळी प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी ५३ शिक्षकांनी (पदवी आणि कनिष्ठ) सहभाग नोंदवला.

- रिसर्च आणि डेवलपमेंट सेल तर्फे शेठ पब्लिकेशनचे संचालक श्री. दीपक शेठ यांचे मार्गदर्शक व्याख्यान दिनांक २२ जुलै २०२४ रोजी कात्यायन सभागृहात ठेवण्यात आले होते. यावेळी ६४ प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी शेठ पब्लिकेशन सोबत MoU करण्यात आला.

- DLLE आणि खादी सेल तर्फे सेवाग्राम आश्रम आणि बाबा आमटे यांच्या आनंदवन येथे दिनांक २३ जुलै २०२४ ते २५ जुलै २०२४ या दरम्यान शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यात १४ विद्यार्थी आणि ४ प्राध्यापकांचा समावेश होता. यावेळी श्री. दीपक पुसदकर (संचालक, सेवाग्राम आश्रम) आणि श्री. दीपक शिव (समन्वयक, आनंदवन आश्रम) यांनी मार्गदर्शन केले.

- ग्रीन क्लब तर्फे 'पर्यावरणाचा ऱ्हास आणि कारणे' या विषयावर व्याख्यान आयोजन दिनांक २४ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते. डॉ.लता घनशामनानी व डॉ. लीना केळशीकर (आर निसर्ग फाउंडेशनचे संस्थापक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यात एकूण १५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी डॉ.महेश बेडेकर, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक उपस्थित होते.

- NSS युनिट तर्फे दिनांक २४ जुलै ३०२४ रोजी गुरुपौर्णिमा महत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी एकूण ४४ विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. रुपेश महाडिक यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

- वाणिज्य विभागातर्फे दिनांक २५ जुलै २०२४ रोजी 'CSA उदयोन्मुख करिअरची संधी' या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकूण १२३ विद्यार्थी उपस्थित होते.

- DLLE विभागातर्फे दिनांक २७ जुलै २०२४ ते ९ ऑगस्ट २०२४ दरम्यान FLN बाय कोटक एज्युकेशन फाउंडेशन उपक्रम आयोजन करण्यात आले होते. प्रतिक्षा डिके, शुभी गौतम यांनी मार्गदर्शन केले. एकूण ७ स्वयंसेवकांनी यात सहभाग घेतला.

- हिंदी विभागातर्फे मुंशी प्रेमचंद जयंती समारंभाचे आयोजन दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी एकूण ४७ विद्यार्थी आणि ४ प्राध्यापक उपस्थित होते.

- वाणिज्य विभाग (फायनांशियल मार्केट) तर्फे दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी 'फायनान्स मधील व्यावसायिक कोर्सेस आणि करीयरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ७४ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी श्री. जितेंदर पेस्वानी CFA CFP यांनी मार्गदर्शन केले.

- इंग्रजी विभागातर्फे लेखकाभ्यास यावर दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी सादरीकरण करण्यात आले. यावेळी ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- टॅलेंट अँड कलचरल समिती तर्फे : मुंबई विद्यापीठाचा ५७ व्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिके पटकावले. यात एकूण ४१ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यात ३२ स्पर्धांपैकी आपल्या महाविद्यालयाने २५ बक्षिसे मिळवली आहेत. यादी खालीलप्रमाणे :-

**नाट्यविभाग**

मोनो ऍक्ट गट क - द्वितीय पारितोषिक
स्किट गट अ - प्रथम पारितोषिक
स्किट गट क - प्रथम पारितोषिक
माइम - द्वितीय पारितोषिक

**संगीत विभाग**

भारतीय शास्त्रीय गायन सोलो – प्रथम पारितोषिक
नारायणसंगीत – पहिले पारितोषिक
तालवाद्य तबला – उत्तेजनार्थ पुरस्कार
नॉनपर्कशन हार्मोनियम – द्वितीय पारितोषिक
इंडियन लाइट व्होकल सोलो – पहिले पारितोषिक
वेस्टर्न व्होकल सोलो – पहिले पारितोषिक
वेस्टर्न ग्रुप साँग – द्वितीय पारितोषिक
भारतीय समूह गीत – पहिले पारितोषिक

**नृत्य विभाग :–**

भारतीय शास्त्रीय नृत्य सोलो – द्वितीय पारितोषिक
भारतीय लोकसमूह नृत्य – द्वितीय पारितोषिक

फायनट्र्स आणि साहित्य विभागासाठी विभागीय फेरी. परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

**साहित्य विभाग :–**

वक्तृत्व गट अ – उतेजनार्थ पुरस्कार
वक्तृत्व गट ब – प्रथम पारितोषिक
वादविवाद गट अ – द्वितीय पारितोषिक
वादविवाद गट ब – प्रथम पारितोषिक
कथाकथन गट अ – प्रथम पारितोषिक

**ललित कला विभाग :–**

मेहेंदी – पहिले पारितोषिक
क्ले मॉडेलिंग – पहिले पारितोषिक
पोस्टर मेकिंग – पहिले पारितोषिक
रांगोळी – तिसरे पारितोषिक
व्यंगचित्र – पहिले पारितोषिक
कोलाज – उत्तेजनार्थ बक्षीस

- अकाउंटिंग आणि फायनान्स विभागातर्फे दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी बँकिंगच्या व्यावसायिक पैलूंवर सादरीकरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. मुग्धा केसकर यांनी मार्गदर्शन केले. यात ७९ विद्यार्थी सहभागी झाले.

- भूगोल विभागातर्फे दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी ढोके – दापिवली, बदलापूर येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १० विद्यार्थी उपस्थित होते.

- वाणिज्य विभागातर्फे दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यार्थी केंद्रित उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यात एकूण ३१ विद्यार्थी सहभागी झाले. डॉ. रश्मी अग्निहोत्री यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- तत्त्वज्ञान विभाग, मानसशास्त्र विभाग आणि फिल्म सोसायटी यांच्या तर्फे तात्विक अभ्यास : सिनेमाच्या जगाचा प्रवास. या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन दिनांक ७ ऑगस्ट २०२४ ते १७ ऑगस्ट २०२४ दरम्यान करण्यात आले होते. एकूण ५४ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला होता.

- भूगोल विभागातर्फे निहळी गाव, वैतरणा विभाग येथे दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. शिवाजी नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० विद्यार्थी उपस्थित होते.

- स्पर्धा परीक्षा सेल आणि बँकिंग व फायनान्स विभागातर्फे दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी ‘स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन’ या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री माधव जगताप (संचालक, सी.डी. देशमुख इन्स्टिट्युटस् ऑफ डमिनेस्ट्रिव करिअर) आणि श्री. गिरीश झेंडे (मोटिवेशनल स्पीकर आणि लाईफ कोच – मास्टर ट्रेनर यशदा) यांनी मार्गदर्शन केले. एकूण १२२ विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

- वाणिज्य विभाग (बँकिंग आणि इन्श्युरन्स) तर्फे दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ६९ विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल श्री. नारायण बारसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- वाणिज्य विभाग (फायननशियल मार्केट) तर्फे दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४६ विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल श्री. नारायण बारसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- इंग्रजी विभागातर्फे बुधवार दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी लायब्ररी ओरियेंटेशन निंबस डाटाबेस प्रात्यक्षिक याचे आयोजन केले होते. यात एकूण १३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- DLLE विभागातर्फे स्वच्छता अभियान आणि पथनाट्य उपक्रमाचे आयोजन दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. यात २४ विद्यार्थी सहभागी झाले होते.

- भूगोल विभागातर्फे दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी कलावंतीण – प्रबळगड, पनवेल येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. शिवाजी नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० विद्यार्थी उपस्थित होते.

- पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे बेसिक ऑफ फोटोग्राफी विषयावर दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी तज्ज्ञ मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कु. चिन्मय शिवडीकर याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी एकूण ७६ विद्यार्थी उपस्थित होते.

- वाणिज्य विभाग (फायननशियल मार्केट) तर्फे दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी एकात्मिक आर्थिक नियोजन आणि गुंतवणूक धोरण विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. जिनय सावला (स्वदेशी गुंतवणूकदार) यांनी मार्गदर्शन केले. १०३ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

- इंग्रजी विभागातर्फे दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी बायसिकल थिवस चित्रपट अभ्यास करण्यात आला. यावेळी १०३ विद्यार्थी उपस्थित होते.

- NSS युनिट आणि कूपर हॉस्पिटल, मुंबई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी एकूण ९० बाटल्या रक्त जमा करण्यात आले. या रक्तदान शिबिरासाठी NSS युनिटमधील २५ विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.

- भूगोल विभगातर्फे दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी कोकणीपाडा, ठाणे येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. हर्षद खोंडले आणि श्री. शिवाजी नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० विद्यार्थी उपस्थित होते.

- DLLE विभागातर्फे हरियाली फाउंडेशन सोबत दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हरियाली फाउंडेशनच्या श्री. अविनाश गोडबोले आणि सुनील पुजारी यांनी मार्गदर्शन केले. एकूण १७ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

- भूगोल विभगातर्फे दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी भोज–बदलापूर येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. समीर झांजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ०७ विद्यार्थी उपस्थित होते.

- राज्यशास्त्र विभागातर्फे 'आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरखंडीय गट' या विषयावर प्रदर्शन आयोजित दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी ७४ विद्यार्थी उपस्थित होते.

- भूगोल विभागातर्फे दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी येऊर, ठाणे येथे क्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री. किशोर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी १० विद्यार्थी उपस्थित होते.

- पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागाने ५८व ५९ व्या महाराष्ट्र राज्य मराठी पारितोषिक वितरण समारोहाला दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी उपस्थिती लावली. यावेळी ४८ विद्यार्थी उपस्थित होते.

- जिमखाना आणि स्पोर्ट्स कमिटीतर्फे प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी Cc ओरियेंटेशन, सोबतच चंदू चॅम्पियन ह्या खेळावर आधारित सिनेमा पाहणे, आणि विद्या प्रसारक मंडळाचे विविध खेळांचे टर्फ यांना भेट या उपक्रमांचे आयोजन दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. प्रमोद खराटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- जिमखाना आणि स्पोर्ट्स कमिटीतर्फे कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ स्पर्धा निवड फेरीचे आयोजन त्यासोबतच काळसेकर महाविद्यालयात झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्याचा सत्कार समारंभ दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी एकूण ४१ विद्यार्थी उपस्थित होते.

- DLLE विभागातर्फे दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी खादी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. उमाकांत डोईफोडे, (सहाय्यक संचालक, ग्राम उद्योग) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी १०८ विद्यार्थी उपस्थित होते.

- कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे 'कंपनी सेक्रेटरी' म्हणून करिअर या विषयावर द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने करिअर समुपदेशन सत्राचे आयोजन दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी केले होते.

  सीएस विश्वनाथन - WIRC OF ICSI चे ठाणे चॅप्टरचे उपाध्यक्ष, कु. साक्षी कदम प्रभारी ठाणे चॅप्टर, अर्चना सावंत, कार्यकारी सहाय्यक ठाणे चॅप्टर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- कनिष्ठ महाविद्यालयातर्फे दिनांक ३ जुलै २०२४ रोजी, सामाजिक न्याय दिन सम्मेलन सप्ताह च्या निमिताने, बार्टी या संस्थेतर्फे १२ वी च्या विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले गेले होते. त्यात श्री रघुनाथ देशमुख सरानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती सविता औटी यांनी केले होते. कार्यक्रमास सर्व समता दूत व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. २०० हून अधिक विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

- कनिष्ठ महाविद्यालयाच्या नेचर क्लब तर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले.

- कनिष्ठ महाविद्यालयातर्फे 'शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर मार्गदर्शन दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### ''माझी वसुंधरा जिल्हा स्तरीय स्पर्धेत'' बांदोडकर महाविद्यालयाला प्रथम क्रमांक

ठाणे महानरपालिकेच्या वतीने ''स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा स्पर्धा'' राबविण्यात आली होती. या स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत महाविद्यालये, उद्योग आणि एनजीओकडून पर्यावरणीय शाश्वत प्रयत्नासाठी केलेल्या अपवादात्मक योगदानाची दखल घेतली जाते. बांदोडकर

विज्ञान महाविद्यालयाला या उल्लेखनीय कामगिरीसाठी ५१,०००/- चे रोख बक्षीस देण्यात आले आहे.



'माझी वसुंधरा स्पर्धा' ही संस्थांना पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास, आणि हवामान बदलाच्या उपाययोजना करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आयोजित केली जाते. या पुरस्कारामुळे विविध पर्यावरणपूरक उपक्रम, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि आमच्या प्रयत्नांचे योग्य दस्तऐवजीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे महाविद्यालयाच्या वचनबद्धतेचे प्रदर्शन होते.

हे यश विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, समिती समन्वयकांचे आणि कार्यालयीन व प्रयोगशाळेतील सहायक कर्मचारी वर्गाचे एकत्रित प्रयत्नांमुळे प्राप्त झाले आहे. विविध पर्यावरण पूरक कार्यक्रमांचे अहवाल, उपस्थिती, अभिप्राय आणि भू-संकेतित छायाचित्रांचे दस्तऐवजीकरण यांची शहानिशा केल्यानंतर हा सन्मान मिळवणे शक्य झाले, असे मत यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी व्यक्त केले. तसेच पर्यावरणशास्त्र विभाग, जैवविविधता व वन्यजीव संवर्धन विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचे त्यांनी कौतुक केले.



या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांचे व संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थेचे अध्यक्ष व विश्वस्त सन्माननीय डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर, श्री. अभय मराठे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आणि शाश्वत भविष्यासाठी या प्रयत्नांना सतत पुढे नेण्याच्या महत्त्वावर भर दिला.

**माजी विद्यार्थांचे यश**



विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ASC Thane Army Boys Unit चा कॅडेट लेफ्टनंट प्रतीक पवार, आज भारतीय लष्करात अधिकारी म्हणून दाखल झाले.

**रसायनशास्त्र विभाग**

२ ऑगस्ट २०२४ रोजी रसायनशास्त्र विषयाचे माजी विद्यार्थी श्री तेजस कदम यांनी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. रसायनशास्त्र विषयातील पदवीनंतर उच्च शिक्षणातील विविध प्रवेश प्रक्रियेबद्दलची माहिती या संवादातून देण्यात आली. या कार्यक्रमाला तृतीय वर्षाचे सर्व विद्यार्थी व ३ शिक्षक उपस्थित होते.



२३ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. विदुला पेंढारकर, क्लिनॉमिक: सेंटर फॉर क्लिनिकल रिसर्च यांचे डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत Career Opportunities

in Clinical Research या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानातून त्यांनी रसायनशास्त्र विषयातील विविध करिअरच्या संधींची ओळख करून दिली. या कार्यक्रमाला प्रथम, द्वितीय, तृतीय व एम.सी. वर्षाचे एकूण १८५ विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.




### खाकीतील सखी

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयातील इंटर्नल क्वालिटी अश्यूरन्स सेल(IQAC) विभागातर्फे २९ ऑगस्ट २०२४ रोजी 'खाकीतील सखी' व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीमती अर्चना दुसाने लाभल्या होत्या. या व्याख्यानाचा उद्देश कायदा आणि सुव्यवस्था, नागरिकांचे हक्क आणि समाजाच्या सुधारणेच्या जबाबदाऱ्यांशी संबंधित विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा होता.




या व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळे सोशल मीडिया आणि UPI ॲप्स वापरताना काय करावे आणि करू नये याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रेल्वे पोलिसांच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या व्याख्यान मध्ये कनिष्ठ महाविद्यालय आणि पदवी महाविद्यालयाचे एकूण १४५ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी श्रीमती. अर्चना दुसाने आणि त्यांच्या संपूर्ण रेल्वे पोलिस पथकाने माहितीपूर्ण सादरीकरण केले.

### सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती

स्वतंत्र दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित ठाणे वाहतूक पोलिसांनी आयोजित केलेल्या सायकल रॅली निमित्त बांदोडकर महाविद्यालयाच्या सायबर वॉरीयर्सनी सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती केली. सायकल रॅलीच्या निमित्ताने समाजात सायबर सुरक्षिततेच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी यात सायबर वॉरीयर्सनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामध्ये सायबर सुरक्षा राखण्यात प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे, यामध्ये सुरक्षित ऑनलाइन वर्तनाचा सराव करणे समाविष्ट आहे, जसे की मजबूत पासवर्ड वापरणे, ईमेल आणि लिंक्सबाबत सावध राहणे आणि सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवणे हे आहे. या रॅलीमध्ये ३०० हून अधिक सहभागींचा सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला सहयोगी प्राध्यापक श्री तेजस जाधव उपस्थित होते.



### ''आरोग्य सुधारण्यासाठी पारंपरिक पौष्टिक आहाराची सवय'' : माहिती तंत्रज्ञान विभाग

माहिती तंत्रज्ञान विभागा तर्फे २३ ऑगस्ट २०२४ रोजी श्रावण महिन्याचे औचित्य साधून, सुदृढ आरोग्यासाठी

पारंपरिक पौष्टिक आहारचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्याकारीता चणे आणि गूळ यांचे मिश्रण विद्यार्थ्यांना वाटण्यात आले. या सत्रामध्ये विभाग प्रमुख श्री अभिजित काळे यांनी विद्यार्थ्यांना चणे आणि गूळ या पारंपारिक पौष्टिक आहाराचे महत्त्व पटवून दिले. एकूण ३०९ विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी या सत्रामध्ये उपस्थित होते.





**प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत रायगड स्टडी टूर**

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे २८ ऑगस्ट २०२४ रोजी प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत, रायगड येथे द्वितीय व तृतीय वर्ष वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती.

कृषी संशोधन केंद्राचे अधिकारी डॉ. तुषार बेडसे, डॉ. मर्दाने व डॉ. जोंधळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अभ्यास सहलीला सहाय्यक प्राध्यापिका डॉ. ऊर्मीला कुमावत आणि डॉ. जयश्री जगताप विद्यार्थ्यांसमावेत उपस्थित होत्या. या अभ्यास सहलीला द्वितीय व तृतीय वर्ष वनस्पतीशास्त्र विभागातील एकूण २२ विद्यार्थी उपस्थित होते.



**ग्रंथालय विभाग**

दिनांक ०१.०८.२०२४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती, तसेच विद्या प्रसारक मंडळ वर्धापन दिवस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरा करण्यात आला. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठे, तसेच डॉ.वा.ना.बेडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच यांच्यावरील माहितीचे, तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



**क्रांतिसिंह नाना पाटील जयंती**

दिनांक ०३.०८.२०२४ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

**डॉ. एस. आर. रंगनाथान जयंती**

दिनांक १२.०८.२०२४ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथान जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तकाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.



जरी आपण कपडे घालण्यात निष्काळजी राहिलात तरी चालेल पण तुमचा आत्मा तंदुरुस्त ठेवा...

**आरोग्य सुधारण्यासाठी पारंपरिक पौष्टिक आहाराची सवय : ग्रंथालय विभाग**

०९ ऑगस्ट २०२४ रोजी श्रावण महिन्याचे औचित्य साधून आरोग्य सुधारण्यासाठी पारंपरिक पौष्टिक आहाराची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी याकरिता ग्रंथालय विभागामध्ये विद्यार्थ्यांना चणे आणि गूळ वितरीत केले गेले. विद्यार्थ्यांना ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर, यांनी पारंपरिक पौष्टिक आहाराची थोडक्यात माहिती दिली.



'माझे ग्रंथालय ग्रंथपेटी' अदलाबदल कार्यक्रम

ग्रंथालय विभाग आणि माझे ग्रंथालय ग्रंथपेटी अदलाबदल रौप्य महोत्सवी कार्यक्रम १६ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न झाला. या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाला ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालायाचे उपाध्यक्ष श्री विनायक गोखले हे प्रमुख वक्ते म्हणून या कार्यक्रमाला लाभले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ प्रा विंदा मांजरामकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुस्तक रूपी भेट देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल सौ कादंबरी मांजरेकर यांनी केले. यावेळी मागील चोवीस ग्रंथपेटी अदलाबदली कार्यक्रमात आयोजित केलेल्या विविध व्याख्यान्यांचा आढावा त्यांनी घेतला.

श्री गोखले यांनी पुस्तकांचे महत्त्व, पुस्तक वाचन करताना मुखपृष्ठ कसे वाचावे, याबद्दल रंजक शब्दात माहिती सांगितली. या कार्यक्रमाला १४ सदस्य उपस्थित होते. श्री गोखले यांच्या भाषणानंतर पुस्तक पेटी अदलाबदलीचा कार्यक्रम संपन्न झाला. सौ रेखा देखणे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१ ऑगस्ट विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन –**

दिनांक १ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. विधी महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी अहवाल सादर केला. आमच्या महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी श्री. तुषार वारंग, श्री. वेंकटेश इयर, श्री. निरंजन देशपांडे ह्यांचा ह्या वेळी सत्कार करण्यात आला.

**१ ऑगस्ट नवीन सहाय्यक प्राध्यापक कामावर रुजू –**

महाविद्यालयामध्ये नवीन पाच सहाय्यक प्राध्यापक दिनांक १ ऑगस्ट २०२४ पासून रुजू झाले आहेत. यामध्ये श्री. यतीन पंडित, डॉ. रुपाली जामोदे, श्री. शिवाजी बिबे, श्रीमती चंदणी घोगरे, कु. प्रेरणा वसावे आणि श्री. मनोज कुमार नाईक (३ सप्टेंबर २०२४)





**रिफ्रेशर कोर्स संपन्न –** महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद एच वाघ यांनी दिनांक ५ ते १९ ऑगस्ट या दरम्यान गुरू घासीदास विश्वविद्यालय आयोजित रिसर्च मेथोडोलॉजी या विषयावरील रिफ्रेशर कोर्स – ग्रेड घेऊन पूर्ण केला. सदर कोर्स हा आभासी पद्धतीने घेण्यात आला होता.

**प्रथम वर्ष विधी वर्गाचे प्रवेश :** प्रथम विधी वर्गाची प्रवेश प्रकिया दिनांक १३ ऑगस्ट पासून सुरू झाली असून, पहिल्या व दुसऱ्या फेरीमध्ये १५३ जागा भरल्या गेल्या आहेत. तिसरी फेरी ९ सप्टेंबर पासुन सुरू होणार आहे.

**३० ऑगस्ट २०२४ : लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा अंतर्गत बाल सुरक्षेबाबत विशेष जागरूकता सत्र**

बाल सुरक्षेबाबत जागरूकता आणि खबरदारी पसरवण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या संस्थांच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व शाळा आणि महाविद्यालयीन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयाच्या कायदेशीर मदत कक्षातर्फे आयोजित करण्यात आला होता. निमंत्रित संसाधन व्यक्ती सहाय्यक सरकारी वकील डॉ. गोपीचंद खाडे जे POCSO (लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा) आणि किशोर वयातील प्रकरणांसाठी सरकारचे तज्ज्ञ आणि सन्माननीय सदस्य आहेत. ते फॉरेन्सिक तज्ज्ञ देखील आहेत. पॉवर पॉईंट सादरीकरण वापरल्याने प्रकरण सहजपणे समजण्यास मदत झाली. त्यांनी २१ ऑगस्ट २०२४ च्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी जाहीर झालेल्या शासन निर्णया वर देखील भाष्य केले.

सर्व शाळा आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले आणि त्यांनी बाल सुरक्षा आणि सरकारी यंत्रणेची माहिती मिळवली, ज्याचे पालन कर्मचारी आणि संस्था यांनी केले पाहिजे. पाणिनी सभागृहात सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत ह्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र गणाने व राष्ट्रगीताने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कु. कृष्णा कामथ यांनी केली, स्वागतपर भाषण महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा. कु. कृष्णा कामथ यांनी केला, आभारप्रदर्शन विधी सहाय्यक कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद वाघ ह्यांनी केले व विद्यार्थी स्वयंसेवक श्री.सचिन लवंगरे यांनी तांत्रिक सहकार्य केले. सदर कार्यक्रमास वि.प्र.मं.चे विधी महाविद्यालय : २२ , वि.प्र.मं.चे बी.एन. बांदोडकर महाविद्यालय : २२, वि.प्र.मं.चे ए.के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा : २१, वि.प्र.मं.ची विद्या मंदिर शाळा: १२, वि.प्र.मं. तंत्रनिकेतन महाविद्यालय:१६, वि.प्र.मं.चे व्ही.एन.बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालय:०७, वि.प्र.मं.चे ए.के. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय : ०४ कर्मचारी उपस्थित होते.



**३१ ऑगस्ट : कायदा आणि तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा**

**कार्यशाळेची रूपरेषा**

| वेळ | विषय | वक्ते |
|---|---|---|
| दु. २.३० | उद्घाटन | प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयाकुमार |
| दु. ३.०० | ई पुस्तक प्रशिक्षण | श्री अविनाश पांडे (सहाय्यक व्यवस्थापक EBC) |
| सायं. ४.०० | व्याख्यान कायदेशीर व्यवसायात संगणक आणि इंटरनेटचा उपयोग | प्रा. श्री विनोद वाघ |
| सायं. ५.३० | डॉ. व्हि. एन. बेडेकर मेमोरियल लेक्चर्स सिरिज : आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावरील व्याख्यान : कृत्रिम बुद्धिमत्ता : मानवता आणि कायद्यासाठी आव्हाने आम्ही तयार आहोत का? | ॲड. प्रशांत माळी |

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी सेल (IQAC) तर्फे कायदा आणि तंत्रज्ञान ह्या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दुपारी १.३० ते सायंकाळी ७.३० ह्या वेळेत करण्यात आले होते. कार्यशाळे अंतर्गत विविध विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांच्या स्वागत पर शब्दांनी झाली. त्यानंतर डिजीटल क्रांतीच्या या युगात ई-पुस्तके ही अति आवश्यक आहे हा विचार समोर ठेवून महाविद्यालयाने नुकत्याच सुरू केलेल्या ई-बुक सुविधेचे प्रशिक्षण EBC चे सहाय्यक व्यवस्थापक श्री. अविनाश पांडे ह्यांनी दिले.

ह्या प्रशिक्षणा नंतर महाविद्यालायचे प्राध्यापक श्री. विनोद वाघ ह्यांनी कायदेशीर व्यवसायात संगणक आणि इंटरनेट चा उपयोग ह्या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वकिली व्यवसाय करताना व विद्यार्थी असताना संगणकाचा वापर कसा उत्तम प्रकारे करू शकतात ह्या विषयी त्यांनी माहिती दिली.


कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावरील व्याख्यान : ''कृत्रिम बुद्धिमत्ता : मानवता आणि कायद्यासाठी आव्हाने. आम्ही तयार आहोत का ?'' - वक्ते अँड. प्रशांत माळी आयोजित करण्यात आले होते. मार्गदर्शक म्हणून ॲड. प्रशांत माळी यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच विधी शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून कसा घेता येईल यावर भाष्य केले, तसेच या कार्यशाळेस संस्थेचे खजिनदार श्री. त्रिविक्रम बेंद्रे उपस्थित होते सदर एक दिवसीय कार्यशाळेमध्ये सहा प्रा. कृष्णा कामथ यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. प्रशांत माळी यांची ओळख सहा. प्रा. यतीन पंडित यांनी सर्वांना करून दिले व आभार प्रदर्शन सहा. प्रा. हेतल मेशरी यांनी केले. सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी देखील उपस्थित होते. सदर व्याख्यानास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्र विभागातर्फे दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन तंत्रनिकेतन ग्रंथालयात उत्साहात साजरा करण्यात आला. सदर ग्रंथपाल दिनाच्या प्रसंगी प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांचे शुभहस्ते भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांनी उपस्थितांना राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाच्या हार्दिक शुभेछा दिल्या. सदर प्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्रात खूपच मोलाचे कार्य केले आहे. ग्रंथालयशास्त्राची पंचसूत्री, (Five Laws of library Science) द्विबिंदू वर्गीकरण, (Colon Classification) वर्गीकृत तालिका संहिता (Classified catalogue code) ही त्यांनी निर्माण केलेली ग्रंथ संपदा आहे. या क्षेत्रातील त्यांचे हे संशोधन जनमान्य झाले आहे. प्रथम मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी अनेक विद्यापीठ ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल म्हणून काम केले. DRTC, ILA, FID, ह्या सारख्या महत्त्वपूर्ण संस्थाची उभारणी त्यांनी केली. देश विदेशातील ग्रंथालय क्षेत्रात भरीव कार्य त्यांनी केले आहे. स्वातंत्र्यानंतर ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रात जो आमूलाग्र बदल दिसून आला त्यामागे डॉ. रंगनाथन यांचे परिश्रम होय. शिवाय त्यांच्या सहकार्याने भारतातील बहुतेक राज्यात ग्रंथालय कायदे स्थापन झाले. सन १९६७ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा हे त्याचेच उदाहरण होय. खऱ्या अर्थाने कुलूप बंद असलेली ग्रंथालये सर्व सामान्य जनतेसाठी खुले झाली. त्याचा उपयोग सर्व सामान्य जनतेला झाला. ग्रंथालये ही ज्ञानप्रसारण साखळीतील महत्त्वाचा दुवा बनली आणि संपूर्ण ग्रंथालय आणि माहितीशास्त्राला ऊर्जितावस्था प्राप्त झाली.

ग्रंथालय क्षेत्रातील या त्यांच्या कार्याची देश विदेशातील ग्रंथालय तज्ज्ञांनी दखल घेतली. त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. भारत सरकारने ही त्यांच्या ग्रंथालय क्षेत्रातील अतुल्य कामगिरीबद्दल सन १९५७ साली पद्मश्री पुरस्कार देऊन यथोचित सन्मान केला. त्यांचा १२ ऑगस्ट हा जन्मदिन दरवर्षी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी १२ ऑगस्ट रोजी ग्रंथपाल दिन पाळण्यात आला. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी ग्रंथालयात येऊन डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. व ग्रंथपाल दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. येणाऱ्या सर्व वाचकांना चॉकलेट दिले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. सौ. गीताली इंगवले, श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. प्रज्ञा दळवी आणि सौ. आनंदी नाकटे यांनी विशेष प्रयत्न केले.



इतिहास सांगतो की, काल सुख होतं. विज्ञान सांगतं की, उद्या सुख असेल. पण माणुसकी सांगते की, जर मन खरं असेल आणि हृदय चांगलं असेल तर दररोज सुख आहे..

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ ऑगस्ट २०२४: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा पहिला तिमाही पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्राध्यापकीय श्रेणीतून डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पंकज नांदूरकर यांनी विशेष कामगिरीचे पारितोषिक



पटकावले. शिक्षकेतर प्रवर्गातून श्री. स्वप्नील नाखवा आणि श्री. विश्वनाथ तांबे यांनी विशेष कामगिरीचे पारितोषिक पटकावले.

२२ ऑगस्ट २२२४: डॉ. कांचन यांनी एमएमएस फायनान्सच्या विद्यार्थ्यांसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथे शैक्षणिक / औद्योगिक भेट आयोजित केली. डॉ. स्मिता जपे, डॉ. कांचन, दर्शना आणि प्रणिता या कार्यालयीन कर्मचाऱ्यांसह ७५ विद्यार्थ्यांनी नॅशनल स्टॉक एक्सचेंजला भेट दिली व एका सत्राला हजेरी लावून आणि थेट बाजारपेठेचे व्यवहार प्रत्यक्ष पाहिले.




२८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२४ : ब्रिम्सच्या एमएमएस कोर्सच्या समन्वयक डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी एमएमएसच्या २०२४-२६ तुकडीच्या नवीन विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कार्यक्रमाचे आयोजन केले. पहिल्या दिवशी संचालक डॉ. नीतिन जोशी यांचे स्वागतपर भाषण झाले. प्रमुख पाहुणे श्री. व्ही. रमेश (गोदरेज कंपनीचे बिझनेस एक्सलन्स हेड) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एमएमएसच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ब्रिम्सच्या सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा परिचय करून दिला. ब्रिम्सचे महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी देखील नवीन विद्यार्थ्यांना संबोधन केले. ब्रिम्सच्या शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. स्मिता जपे यांनी अभ्यासक्रमासंबंधी मार्गदर्शन केले व डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने उद्घाटन कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२४ पर्यंत नवीन विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवरील मार्गदर्शक सत्रे आयोजित करण्यात आली.



२८ ऑगस्ट २०२४ : ब्रिम्सच्या मानव संसाधन शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी HRIS आणि HCM या विषयावर, गोदरेज आणि बॉइसमध्ये कार्यरत असलेल्या व HRIS आणि HCM विभाग हाताळणाऱ्या श्रीमती. समीता खांबे यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले.





जीवनाच्या बँकेत जेव्हा पुण्याईचा बॅलेंस कमी होतो तेव्हा सुखाचे चेक बाउंस होतात!

२९ ऑगस्ट २०२४ : विद्यार्थ्यांमध्ये संघ कौशल्य विकसित करण्यासाठी ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थापन खेळ आयोजित करण्यात आले.





३१ ऑगस्ट २०२४ : डॉ. कांचन यांनी प्रशिक्षण आणि विकास अभ्यासक्रमाचा भाग म्हणून २०१५-१७ तुकडीच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती. धनश्री डागा यांना प्रशिक्षण आणि विकास या क्षेत्रातील त्यांचा अनुभव आणि संधी याविषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले.





## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाद्वारे 'एमआयएस थर्मोकपल' या विषयावर अतिथी व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमासाठी संसाधन व्यक्ती म्हणून माजी BARC वैज्ञानिक श्री. नरेंद्र गोळे हे लाभले. यावेळी त्यांनी विविध उद्योगांमध्ये MIS थर्मोकपल्सच्या डिझाईन, कार्यक्षमता आणि अनुप्रयोगांवर सखोल माहिती दिली. या सत्रामुळे तापमान मोजणी तंत्रज्ञानातील कौशल्य व वास्तविक जीवनातील अंमलबजावणी आणि समस्या निवारणासाठी व्यावहारिक ज्ञान यावेळी सहभागींना मिळाले.



दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाद्वारे SAP/ERP प्रणालींवर अतिथी व्याख्यान पार पडले. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते माजी BARC वैज्ञानिक श्री. कारखानीस लाभले. SAP/ERP प्रणालींच्या कार्यक्षमता, अंमलबजावणी आणि व्यवसाय प्रक्रियांवरील परिणाम यावर सखोल माहिती देण्यात आली.



दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाद्वारे 'Strain' या विषयावर अतिथी व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमासाठी संसाधन व्यक्ती म्हणून माजी बीएआरसी शास्त्रज्ञ श्री. नरेंद्र गोळे यांनी मार्गदर्शन केले. गेजचे तत्त्व, प्रकार आणि अनुप्रयोग यांचा अभ्यास करणे होता, विशेषत: तणाव आणि स्ट्रेन मापनामधील त्यांची भूमिका समजावून सांगणे. विद्यार्थी समन्वयक भार्गव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, सहभागी सदस्यांनी स्ट्रेन गेजच्या निवडी, स्थापने आणि विश्लेषणात आपली ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये वाढवली, ज्यामुळे विविध संदर्भांमध्ये अचूक तणाव आणि स्ट्रेन मूल्यांकन साध्य करण्यात त्यांना मदत झाली.



दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या सिव्हिल इंजिनीअरिंग स्टुडंट असोसिएशन तर्फे मैत्री सप्ताहा निमित्त मैत्री दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी समिती उपाध्यक्ष सुरज बेंद्रे यांनी सर्वसाधारण प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विभागातील कु. स्वराज शिगवण या विद्यार्थ्याने सर्व विद्यार्थ्यांसाठी अल्पोहर व मजेदार खेळांचे व्यवस्थापन यावेळी केले. कार्यक्रम सरते शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकांना फ्रेन्डशिप बँड बांधून कार्यक्रमाची सांगता केली.



दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालायातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने महाविद्यालय कॅम्पसमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.



दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आर. सी. कनिष्ट महाविद्यालय, पेढे परशुराम चिपळूण येथे 'विद्युत वायरिंग आणि सुरक्षा' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. याठिकाणी विद्युत विभागाचे प्रा.मीनल साठे व प्रा.योगेश काटदरे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.

दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने 'इनोवेशन कॅटालिस्ट्स : प्रादेशिक इकोसिस्टम एनाब्लर्स' या विषयावर एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या सिव्हिल इंजिनीअरिंग स्टुडंट असोसिएशनने (CESA) विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी 'उत्कृष्टतेचा शोध केवळ पास होणे पुरेसे नाही' या विषयावर तज्ज्ञ व्याख्यान आयोजित केले. सर्वप्रथम श्री.प्रफुल्ल पागनीस यांनी त्यांचा बहुमोल वेळ प्राध्यापकांच्या संवादासाठी घालवला. त्यांनी त्यांचे कामाचे अनुभव प्राध्यापकांसोबत शेअर केले आणि प्रात्यक्षिक अभिमुख अध्यापन शिक्षण सुधारण्यासाठी सुचवले.

दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील संगणक विभागाच्या विद्यार्थ्यांना SAP/ERP या विषयावर माजी BARC शास्त्रज्ञ श्री.संतोष कारखानीस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी तांत्रिक कौशल्ये

वाढवून, प्रणाली एकत्रीकरण समजून घेणे आणि समस्या सोडवण्याची क्षमता सुधारणे याचे फायदे सांगितले. त्याचसोबत SAP/ERP मधील करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन केले.



दि. १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील संगणक विभागातील विद्यार्थ्यांना माजी BARC शास्त्रज्ञ श्री. नरेंद्र गोळे यांनी प्रकल्प विषयाच्या निवडीबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी प्रकल्पाच्या व्यावहारिक व्यवहार्यतेसह चर्चा केली. श्री. गोळे यांनी प्रकल्पासाठी नवीनतम तंत्रज्ञानाच्या वापराविषयी त्यांचे विचार देखील मांडले.



दि. १२ व १३ ऑगस्ट रोजी Council of Senior Scientists अर्थात CSS visit अंतर्गत ज्येष्ठ शास्त्रज्ञांची व्याख्याने आयोजित केली होती. श्री. कारखानीस यांनी Innovative strategies for enhancing Productivity या विषयावर व्याख्यान दिले. तसेच श्री वैद्य यांनी Metallurgy या विषयावर आधारित Heat Treatment and Surface Hardening या मुद्यावर व्याख्यान दिले. विभागातील विद्यार्थी, शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

दिनांक १२ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२४ या तीन दिवसीय कालावधीत दरवर्षीप्रमाणे यंदाही भाभा अणुसंशोधन केंद्रातील १२ ज्येष्ठ वैज्ञानिकांची एक परिषद या सत्रात सुद्धा महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होती. यावेळी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाद्वारे विशेष अशा 'स्वरसंध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्युत विभागाचे प्राध्यापक श्री. योगेश काटदरे यांनी राग हंसध्वनी सादर करून त्यांनी मैफिलीची सुंदर सुरुवात केली. त्यापाठोपाठ त्यांनी मंदारमाला नाटकातले 'जय शंकरा गंगाधरा' हे पद सुद्धा सादर केले. त्यानंतर विद्युत विभागाच्या प्राध्यापिका सौ. प्रीती भोळे यांनी 'उठ पंढरीच्या राया' हे गाणं सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. अणुविद्युत आणि दूरसंचार अभियांत्रिकीच्या प्राध्यापिका सौ. गौरी जोशी यांनी 'प्रीतीचा कल्पतरू जो मला लाभला' हे पद सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यानंतर भाभा अणुसंशोधन केंद्रातीलच एक ज्येष्ठ वैज्ञानिक श्री. राजेंद्रकुमार कुलकर्णी यांनी 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' हे भावगीत सादर करून कार्यक्रम वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. त्यानंतर खास लोकाग्रहास्तव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या पत्नी सौ. सुमेधा बेडेकर यांनी 'सोहम हर डमरू बाजे' हे नाट्यगीत सादर केले. त्यालाही उपस्थितांनी जोरदार प्रतिसाद दिला. त्यानंतर खास लोकाग्रहास्तव विद्या प्रसारक मंडळातील ज्येष्ठ सदस्य श्री. मराठे यांनी उत्कृष्ट तबला सोलोवादन सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी पुन्हा श्री. योगेश काटदरे यांनी 'कैवल्याच्या चांदण्याला' ही भैरवी सादर केली. हेदवी येथील श्री. अनिल ओक आणि त्यांचे बंधू श्री. प्रकाश ओक हे या कार्यक्रमासाठी अनुक्रमे संवादिनी आणि तबलासाथीकरिता उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापिका मीनल साठे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेकरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष

डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र सोनी, उपप्राचार्य श्री. अविनाश पवार, विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख श्री. सतीश घोरपडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने सर्व विद्यार्थ्यांसाठी श्री. प्रफुल्ल पागनीस सर यांचे 'प्रकल्प व्यवस्थापनातील नावीन्य : अंदाज, नियोजन आणि शेड्यूलिंगची मुख्य भूमिका' या विषयावर तज्ज्ञ व्याख्यान आयोजित केले. सरांनी लवचिकता आणि अनुकूलता वाढवणाऱ्या प्रकल्प नियोजनासाठी नावीन्यपूर्ण दृष्टिकोन स्पष्ट केले. त्याचे अनुभवही सांगितले. त्यांनी अंदाज, नियोजन आणि शेड्युलिंगमधील नावीन्यपूर्ण पद्धतींबद्दल चर्चा केली ज्यामुळे प्रकल्पाच्या यशावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे कामगिरी सुधारते. त्यांनी सर्व टप्पे अतिशय सुरेखपणे समजावून सांगितले, तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.



दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने सर्व विद्यार्थ्यांसाठी श्री प्रफुल्ल पागनीस यांचे 'ब्रीज अभियांत्रिकी: आधुनिक पायाभूत सुविधांसाठी नावीन्यपूर्ण उपाय' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. श्री.प्रफुल्ल पागनीस यांनी त्यांना पुलाच्या बांधकामा दरम्यान आलेले अनुभव सांगितले. त्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या साहाय्याने पुलाच्या बांधकामाच्या विविध टप्प्यांबद्दल चर्चा केली आणि वेगवेगळ्या प्रक्रियेची छायाचित्रे वापरून सर्व टप्पे अतिशय सुरेखपणे समजावून सांगितले.



दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी Applied Science and Humanities department आणि Institutions Innovation Council यांच्या संयुक्त विद्यमाने 'शोध हिग्ज बोसान कणांचा' या विषयावर डॉ. सुधाकर आगरकर यांचे व्याख्यान पार पडले. या व्याख्यानामध्ये हिग्ज बोसान कणाच्या शोधाचा इतिहास डॉ. सुधाकर आगरकर यांनी कथारुपामध्ये सांगितला. व्याख्यानामधून हिग्ज बोसॉनच्या शोधाबद्दल विद्यार्थी व शिक्षक यांना मौल्यवान माहिति मिळाली.



दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने 'यश मापन: स्टार्टअप विकासात स्ट्रेन गेजेस' या विषयावर एक विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ह्या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते म्हणून भाभा अणु संशोधन केंद्राचे (BARC) वरिष्ठ शास्त्रज्ञ उपस्थित होते.

दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील संगणक विभागातील विद्यार्थ्यांना माजी BARC शास्त्रज्ञ श्री. नरेंद्र गोळे यांनी 'कौशल्याचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. दैनंदिन जीवनातील मूलभूत आठ कौशल्ये असायलाच हवीत यावर त्यांनी सविस्तर विवेचन केले. यावेळी प्रत्येक कौशल्याचे महत्त्व वास्तविक जीवनातील उदाहरणांसह समजावून सांगितले.



दिनांक १४ ऑगस्ट २०२४ महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व संगणक अभियांत्रिकी विभागातील तीन प्राध्यापकांना त्यांच्या उल्लेखनीय संशोधन कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांचे वितरण भाभा अणु संशोधन केंद्राचे (BARC) वरिष्ठ शास्त्रज्ञांच्या हस्ते करण्यात आले. प्रा.गजानन खापरे, प्रा.गौरी जोशी, आणि प्रा.अपर्णा मुरकर या प्राध्यापकांना UGC Care आणि त्यापेक्षा उच्च दर्जाच्या जर्नल्समध्ये तीन किंवा अधिक संशोधन पत्रिका प्रकाशित केल्याबद्दल प्रोत्साहन पुरस्कार प्रदान करण्यात आला.



दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. भक्ती घोरपडे यांनी SVJCT च्या इंग्लिश मीडियम स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय डेरवणला भेट दिली. शाळेतील -TL आणि SIC सह IIC संबंध मजबूत करणे आणि मेंटरशिप आणि मार्गदर्शन प्रदान करण्याच्या फ्रेमवर्कबद्दल चर्चा यावेळी केली. औपचारिक परिचयानंतर 'स्थापत्य अभियांत्रिकीतील करिअरच्या संधी' या विषयावर अतिथी व्याख्यान झाले. सत्रानंतर एसव्हीजेसीटी डेरवणच्या माननीय शाळा व्यवस्थापक श्रीमती शरयू यशवंतराव, मुख्याध्यापक सरांची भेट घेऊन पुढील काही उपक्रमांवर चर्चा करण्यात आली.



महाविद्यालयातील यांत्रिकी विभागातील प्रा. जितेंद्र आचार्य, प्रा. स्वानंद जोशी, प्रा. राहुल कुंडिया, प्रा.हृषिकेश भावे आणि प्रा.प्रणव सावंत यांचे Development of Body Armor : Balastic Plate by using CFRF Titanium alloy या विषयावरील पेटंट पब्लिश झाले.

दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी Applied Science and Humanities department आणि Institutions Innovation Council यांच्या संयुक्त विद्यमाने Angel Investing/VC funding opportunities for early stage Entrepreneurs या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी TWJ Learning solution चे सेल्स प्रमुख श्री.चेतन दुरंडे प्रमुख व्याख्याते म्हणून लाभले. या व्याख्यानामध्ये त्यांनी नव्याने व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांना उपलब्ध असणाऱ्या Angel Investing आणि VC funding opportunities बद्दल विस्तृत माहिती दिली.



ज्याने कधीही चूक केली नाही त्याने कधीही नवीन काहीही करण्याचा प्रयत्न केला नाही.




दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी यांत्रिकी विभागातर्फे श्री.श्रवण दांडेकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. Entrepreneurship Day Celebration अंतर्गत असलेल्या या व्याख्यानात दांडेकर यांनी नारळापासून काथ्या आणि कोकोपीट तयार करायच्या व्यवसायाची माहिती दिली.

दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या वतीने माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आबलोली येथे ११ वी व १२वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी 'स्मार्ट फिजिक्स–स्मार्टफोनच्या मदतीने भौतिकशास्त्र प्रयोग' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचा उद्देश विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्राच्या संकल्पनांचे सखोल ज्ञान देणे आणि स्मार्टफोनच्या सेन्सर्सचा वापर करून प्रयोग कसे करता येतील, याची माहिती देणे हा होता. या व्याख्यानाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अनुभवाला एक नवा आयाम दिला.




दिनांक २६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स व संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने बायोमेडिकल, इंडस्ट्री ५.०, सायबर सुरक्षा आणि डिजिटल फॉरेन्सिक्समध्ये उभरत्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. हे कार्यशाळा Google Meet आणि YouTube वर ऑनलाइन लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे आयोजित केली. ह्या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते होते डॉ. आर. पी. राम कुमार प्रोफेसर (एआय आणि एमएल), CRIET, हैदराबाद, डॉ. संदीप कुमार सूद  प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापक, संगणक अनुप्रयोग, NIT हरियाणा, डॉ. सुदीप पॉल सहयोगी प्राध्यापक, बायोमेडिकल अभियांत्रिकी विभाग, नॉर्थ-ईस्टर्न हिल युनिव्हर्सिटी, शिलाँग, डॉ. पुनीत मिश्रा सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विभाग, लखनऊ विद्यापीठ, डॉ. श्रीजीत आर, सहयोगी प्राध्यापक, माहिती प्रणाली आणि व्यवसाय विश्लेषण, राजागिरी कॉलेज ऑफ सोशल सायन्सेस, केरळ यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाबपुष्प देऊन स्वागत केले गेले. यावेळी प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ. गणेश दिवे आणि प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



**Posting under the Reg No MH/MR/TNC 27/2004 2006**


Vidya Prasarak Mandal's

# College of Engineering, Thane




## Courses Offered

- Automation and Robotics
- Computer Engineering
- Electrical Engineering
- Electronics & Telecommunication Engineering
- Information Technology

## Why VPMCOE?

- Experienced Faculty
- Robust Curriculum
- Adequate Infrastructure
- Well Equipped Laboratories
- Industry Collaboration
- Research Opportunities
- Student Support Services
- Entrepreneurship & Innovation
- Industry Exposure

**Vidya Prasarak Mandal's College of Engineering, Thane**
'Jnanadweepa' Bldg No.1, Thane College Campus, Thane (W) 400 601
◈Approved By AICTE, New Delhi ◈Affiliated to University of Mumbai
Tel No: +91 - 9619651156
E-mail : vpmcoethane@vpmthane.org


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.